दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१२७ बुधवार दि.२८ ऑगस्ट २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

कायद्याविषयी प्रबोधन आणि धाकही हवा

महिलांवरील अत्याचाराविरोधात कडक कायदे करू असे सरकार सांगत असले तरी वरचेवर अत्याचार वाढतच चालले आहेत. ते पाहून अत्याचाराविरोधातील कायदे कशासाठी असा प्रश्न पडतो. राज्यातील मुली व महिला बेपत्ता होत आहेत ही अतिशय चिंतेची अन् गंभीर बाब आहे. बेपत्ता मुली व महिला यांच्या संरक्षणाची जबाबदारी राज्य सरकारची आहे याचे भान ठेवा, अशा शब्दांत खंडपीठाने राज्य महिला आयोग आणि रेल्वे पोलिसांना खडसावले आहे. दरवर्षी असंख्य मुली आणि महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

गुजरातमध्ये पावसाचा हाहाकार, मृतांची संख्या ८ वर

अहमदाबाद । वृत्तसेवा

मागील २ ते ३ दिवसांपासून गुजरातमधील पावसाने हाहाकार उडवला आहे. दरम्यान पावसाशी संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. सुमारे १७०० लोकांना पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यात आले आहे. तर २३८७१ लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आल्याचे राज्य सरकारकडून प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे की, गुजरातवर कमी दाबाचे क्षेत्र तीव्र आहे. त्यामुळे

आंदोलनातील ७५० शेतकऱ्यांना शहीदाचा दर्जा देणार!

काँग्रेसची घोषणा, खा.कंगणाला जोरदार प्रत्यूत्तर

नवी दिल्ली । वृत्तसेवा

भाजप खासदार अभिनेत्री कंगणा राणावत हिने दिल्ली येथील शेतकरी आंदोलनासंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर देशभरातून एकच टीकेची झोड उठली आहे. देशभरातील शेतकरी नेत्यांसह अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंगणाच्या वादग्रस्त विधानाचा निषेध केला आहे. यानंतर काँग्रेसने मोठी घोषणा केली असून, दिल्लीच्या शेतकरी आंदोलनात जीव गमावलेल्या ७५० शेतकऱ्यांना शहीदांचा दर्जा आणि कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्याची घोषणा काँग्रेसने केली आहे.

काँग्रेस खासदार रणदीप सुरेजावाला यांनी कंगणाच्या वक्तव्यावर जहरी टीका केली आहे. याबाबत त्यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत कंगणावर निशाणा साधला आहे. सुरजेवाला यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, की शेतकऱ्यांना बलात्कारी आणि हत्यारे म्हणणाऱ्या भाजपने कान उघडून ऐकावे. काँग्रेसचे सरकार आल्यावर शेतकरी आंदोलनात ज्या ७५० शेतकऱ्यांना जीव गमावावे लागले त्यांना शहीद दर्जा दिला जाईल आणि त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला नोकरीही दिली जाईल अशा आशयाची पोस्ट करत सुरजेवाला यांनी भाजपला सुनावले आहे.

दिल्ली येथे तीन कृषी कायद्यांविरोधात पंजाब, हरियाणासह उत्तरप्रदेशातील शेतकऱ्यांनी दिल्ली येथे आंदोलन केले होते. या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर बोलताना कंगणाने म्हटले की, सध्याचे सरकार नसते तर, शेतकरी आंदोलनावेळी पंजाबमध्ये बांगलादेशसारखी परिस्थिती निर्माण झाली असती. तसेच आंदोलनादरम्यान महिलांवर बलात्कार आणि मोठा हिंसाचार झाल्याचा धक्कादायक आरोप कंगणाने केला आहे. दरम्यान, यापूर्वीही पहिल्या शेतकरी आंदोलनावेळीही कंगणाने वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यावेळी तीने शेतकरी आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना दहशतवादी संबोधले होते. कायमच वादग्रस्त विधाने करून चर्चेत राहणाऱ्या कंगणावर तेव्हाही टीकेची झोड उठवली होती.

शिवाजी महाराज पुतळाप्रकरणी कंत्राटदार-स्ट्रक्चरल सल्लागारांच्या विरोधात गुन्हा दाखल

सार्वजनिक बांधकाम विभागाने दाखल केला गुन्हा

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासाठी जबाबदार असलेल्या कंत्राटदार आणि स्ट्रॅक्चरल सल्लागाराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पुतळ्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनावरण केल्यानंतर आठ महिन्यांनी सोमवारी (२६ ऑगस्ट २०२४) कोसळला.

बांधकामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा ◀◀ पान २ वर

अखेर शेलार यांची सरकारच्यावतीने माफी

पुतळा प्रकरणी राज्य सरकारवर मोठ्या प्रमाणावर टीकेची झोड उठली. विरोधकांबरोबरच अनेक शिवप्रेमी आणि विविधस्तरांतूनही टीकेची झोड उठली. त्यामुळे अखेर भाजपाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी सरकारच्यावतीने माफी मागितली. या पुतळ्याच्या टीकेवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा पुतळा नौदलाने उभारल्याचे सांगत हात झटकण्याचा प्रयत्न केला. मात्र विरोधकांसह सर्वच स्तरातून टीका तशीच सुरु राहिली. आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अखेर शिवाजी महाराजांच्या पुतळा कोसळण्याच्या घटनेवरून होणारे संभाव्य राजकारण भाजपासह शिवसेना, आणि अजित पवार यांच्या महाराष्ट्रवादीला परवडणारे नाही. त्यामुळे अखेर भाजपाचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार आशिष शेलार यांनी राज्य सरकारच्यावतीने पुतळा कोसळण्याप्रकरणी विरोधकांची आणि जनतेची माफी मागितली आहे. दरम्यान, आशिष शेलार यांनी सरकारच्यावतीने माफी मागितली असली तरी ते प्रत्यक्ष सरकारमध्ये सहभागी नसल्याने त्यांच्याऐवजी मंत्रिमंडळातील एखाद्या जबाबदार मंत्र्याने माफी मागितली तर जनेतेतील संताप कमी होईल अशी मागणी जनतेकडून होत आहे.

लाडक्या बहिणींनो पैसे घ्या, फडणवीसांनी नागपूरची प्लॉटिंग, वा जमिन विकून पैसे दिले नाहीत -जरांगे

सगळ्यांचा हिशेब चुकता करणार

देवेंद्र फडणवीस तुमचा हिशेब चुकता करणार आहे. आमचे लेकरं जेलमध्ये घातले, वेळ हातात आल्यावर हिशेब चुकता करीन म्हटले की करीन हा माझा शब्द आहे, असे थेट मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना आव्हान दिले. मी त्यांना सरळ करणार आहे. वेळ आणि काळ सोबत असायला पाहिजे आणि येणाऱ्या काळामध्ये सगळ्यांचा हिशेब चुकता करणार आहे, असे देखील मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

बीड । प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेवरून सध्या विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये चांगलीच जुंपली आहे. आता मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी देखील लाडकी बहीण योजनेवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला आहे. सरकारने सध्या लाडकी बहीण योजना आणली आहे. ही योजना चांगली आहे. योजनेचे फॉर्म भरा, पैसेही घ्या पैसे आपलेच आहेत देवेंद्र फडणवीस यांनी काय त्यांची नागपूरची प्लॉटिंग किंवा जमिनी विकून आपल्याला पैसे दिले नाहीत, असे मनोज जरांगे म्हणाले.

गेवराई तालुक्यातील तांदळा या गावात मनोज जरांगेंचे जेसीबीतून फुले उधळत स्वागत करण्यात आले. यावेळी तांदळा गावकऱ्यांकडून मोटरसायकल रॅलीचं आयोजन करण्यात आले होते. मनोज जरांगे म्हणाले, हा पैसा सर्वसामान्य जनतेचा आहे. जनतेच्या करामधून आणि जीएसटी, इन्कम टॅक्स आणि शेतकऱ्यांच्या टॅक्समधून गोळा केलेला पैसा आपलाच आहे. तोच पैसा आपल्याला परत करत आहेत. राज्याच्या सरकारने लाडकी बहीण ◀◀ पान २ वर

आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना

सानुग्रह अनुदान लागू

मुंबई । प्रतिनिधी

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू झाल्यास रु.१०.०० लाख व कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास रु.५.०० लाख रकमेचे सानुग्रह अनुदान लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून, या संदर्भातील महाराष्ट्र शासनाचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. १ एप्रिल, २०२४ पासून हा निर्णय लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना सानुग्रह अनुदान लागू करण्यासाठी प्रति वर्ष अंदाजित रु.१.०५ कोटी इतका आवर्ती निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी आवश्यक असणारा निधी आगामी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. आरोग्य यंत्रणा, सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यांमध्ये आरोग्यासंदर्भात जागरुकता, सुसंवाद, समन्वय,

राज्य सरकारकडून आदेश जारी

प्रोत्साहन, निर्माण करण्याच्या दृष्टीने "आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक" महत्वपूर्ण सामाजिक दुवा म्हणून कार्यरत आहेत. राज्यातील आशा स्वयंसेविकांचा माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन इत्यादी कारणांसाठी नियमित गृहभेटी देणे, माता व बालकांना मार्गदर्शन करणे, रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करणे अशा प्रकारची कर्तव्ये बजावावी लागतात. आशा स्वयंसेविका ◀◀ पान २ वर

आज आष्टीत रंगणार महादहीहंडी उत्सव

मोठ्या संख्येने उपस्थित रहा -जयदत्त धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात उद्या बुधवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या भव्य दहीहंडी महोत्सवास आष्टीसह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवानेते जयदत्त सुरेश धस यांनी केले आहे.

आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात बुधवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता युवा नेते जयदत्त धस मित्र मंडळाच्यावतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवासाठी माजीमंत्री सुरेश धस यांच्यासह मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री लावण्यतारका मानसी नाईक, सिने अभिनेत्री सई मांजरेकर, झेबा शेख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर या महोत्सवामध्ये डीजेच्या तालावर तरुणाई फिरकणारा असून निशा कुसेकर ही प्रसिद्ध सूत्रसंचालिका या महोत्सवाचे सूत्रसंचलन करणार आहे. तर या दहीहंडी उत्सवाचे इव्हेंट बीड येथील सुप्रसिद्ध ड्रीमलँड चे रविराज जेधे हे करणार आहेत. दहीहंडी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून आष्टी शहरात होणाऱ्या या दहीहंडी महोत्सवास आष्टी तसेच तालुक्यातील नागरीकांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवण्याचे आवाहन युवानेते जयदत्त धस यांनी केले आहे.

कोलकातामध्ये आंदोलक–पोलिसांत धुमश्चक्री

कोलकाता । वृत्तसेवा

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी करत कोलकातामध्ये रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थी आंदोलक आणि पोलिसांमध्ये धुमश्चक्री उडाली. राज्य सचिवालय नबन्नाजवळील हावडा ब्रिजवर पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी लाठीचार्ज केला, अश्रूधुरांच्या कांड्या फोडल्या, पाण्याच्या फवाऱ्याचा मारा केला. तरीही आंदोलक मागे हटायला तयार नव्हते. पोलिस–प्रशासन आंदोलकांना मागे हटवण्याचा प्रयत्न करत असताना आंदोलकांनी हावडा ब्रिजवर ठिय्या मांडला.

कोलकाता येथील आरजी कार मेडिकल प्रक्षिणार्थी महिला डॉक्टरावरील बलात्कार आणि हत्या प्रकरणी विद्यार्थ्यांनी आंदोलन ◀◀ पान २ वर

सरपंचासह तिघांचा जाळून घेण्याचा प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील रेवकी– देवकी येथील तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल दिला नाही, तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली नाही, या कारणावरून सरपंचासह तिघा जणांनी अंगावर रॉकेल ओतून घेण्याचा प्रकार मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी घडला होता. या अनुषंगाने बीड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे हे रजेवर गेले आहेत.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे रजेवर

या संदर्भात माहिती अशी की, रेवकी–देवकी ग्रामपंचायतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात यावी, या आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी आणि बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे देण्यात आले होते. या निमित्ताने जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ. ज्ञानोबा मोकाटे आणि गटविकास अधिकारी सचिन सानप यांच्या विषयी तक्रार करण्यात आली होती. या अनुषंगाने योग्य तो अहवाल दिला नाही आणि त्यामुळे सरपंच यांच्यासह तिघा जणांनी अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न दिनांक २६ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात केला होता . या सर्व प्रकारामुळे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे हे रजेवर गेले आहेत. दरम्यान या प्रकरणाचा तपास करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू :६.५० क्विंटल			
	२,६१७	२,६३०	२,६२३
ज्वारी/हायब्रिड : ७५.०० क्विंटल			
	१,८००	२,९००	२,२३८
मूग : ३५.५० क्विंटल			
	६,८००	७,६००	७,३३३
तूर : १७.५० क्विंटल			
	९,९३१	९,९३१	९,९३१
उडीद : २.५० क्विंटल			
	४,९०१	७,४००	६,१५०
बाजरी: ४८.५० क्विंटल			
	२,१५०	२,९८५	२,५९७
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल			
	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीन: ३२.५० क्विंटल			
	४,१००	४,२५०	४,१८५
हरभरा: १.५० क्विंटल			
	५,५००	५,५००	५,५००

अग्रलेख

कायद्याविषयी प्रबोधन आणि धाकही हवा

महिलांवरील अत्याचाराविरोधात कडक कायदे करू असे सरकार सांगत असले तरी वरचेवर अत्याचार वाढतच चालले आहेत. ते पाहून अत्याचाराविरोधातील कायदे कशासाठी असा प्रश्न पडतो. राज्यातील मुली व महिला बेपत्ता होत आहेत ही अतिशय चिंतेची अन् गंभीर बाब आहे. बेपत्ता मुली व महिला यांच्या संरक्षणाची जबाबदारी राज्य सरकारची आहे याचे भान ठेवा, अशा शब्दांत खंडपीठाने राज्य महिला आयोग आणि रेल्वे पोलिसांना खडसावले आहे. दरवर्षी असंख्य मुली आणि महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा बेपत्ता महिलांचे पुढे काय होते, याचे उत्तर ना समाजाला मिळते ना त्यांच्या कुटुंबियांना. विवाहाचे आश्वासन देत पळवून नेलेल्या काही महिलांना आखाती देशात नेऊन तिथे त्यांना गैरकृत्ये करण्यास भाग पाडल्याच्या अनेक घटना आतापर्यंत उघडकीस आल्या आहेत.

अनेक महिलांशी तर रीतसर विवाह करून नंतर त्यांना परदेशात शरीरविक्रय करण्याच्या रॅकेटमध्ये गोवण्यात आले, तर घरकामासाठी नेऊन महिलांचे शोषण करण्यात आल्याच्या घटनाही काही कमी नाहीत. दिशाभूल करून अथवा फूस लावून पळवलेल्या मुलींचा वापर अनैतिक, बेकायदेशीर कृत्ये करण्यासाठीही केला जाऊ शकतो. काही मुली विवाह करण्यासाठी घरातून पळून गेल्याचे आढळत असले तरी मोठ्या प्रमाणात अशा महिलांचा थांगपत्ता लागत नसल्याने रेकॉर्डवर त्या कायमच 'मिसिंग' म्हणून नोंदल्या जातात. कालांतराने त्यांचा ठावठिकाणा शोधण्याचे काम पोलिसांकडून थांबवले जाते. त्या महिलेच्या चारित्र्यावर बोट ठेवत शोधकामाची जबाबदारी कशी झटकता येईल, याकडेच पोलिसांचा कल असतो आणि हेच आक्षेपार्ह आहे. बहुतेक वेळा हत्या अथवा अपहरण अशा शक्यता लक्षात घेऊन तपास केला जात नाही. या संवेदनशील विषयाबाबत राज्य आणि केंद्र सरकारही गंभीर नसल्याचे दिसून येते. वर्षभरापूर्वी देशभरातून बेपत्ता झालेल्या मुलींची आकडेवारी गृहमंत्रालयाने संसदेत ठेवली होती. ही आकडेवारी धक्कादायक होती. बेपत्ता लहान मुले-मुली, तरुणी आणि महिलांचा शोध घेणे हे राज्य सरकारचे कर्तव्यच आहे. अर्थात बेपत्ता महिलांची ही आकडेवारी केवळ रेकॉर्डवरील आहे. कागदोपत्री नोंद न झालेल्या प्रकरणांची आकडेवारी वेगळीच असेल. बेपत्ता मुली आणि महिलांचा शोध घेण्यासाठी आत्तापर्यंत काय पावले उचलली गेली आणि मानवी तस्करी रोखण्यासाठी राज्याच्या पोलिस महासंचालकांनी रेल्वे पोलिसांमार्फत कोणत्या उपाययोजना केल्या याची माहिती देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला एका याचिकेदरम्यान सुनावणी करताना दिले आहेत.

मानवी तस्करी हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा गहन प्रश्न आहे. त्यासाठीचे जाळे विविध देशांमध्ये विणले गेले आहे. नोकरीच्या आमिषामुळे गरजू महिला त्यात अलगद अडकतात. कुटुंबियांचा आधार नसलेल्या महिला अशा रॅकेटमध्ये सहज फसतात. या महिलांना संबंधित व्यक्तीने झिडकारले तर त्या वाममार्गाला जाऊ शकतात. त्यामुळे बेपत्ता मुलींचा, महिलांचा प्रश्न ही एक सामाजिक समस्या आहे हे सरकारने मान्य करून अशा प्रकरणांची तड लावणे अपेक्षित आहे. महिला आणि मुली बेपत्ता होण्यामागे केवळ प्रेम प्रकरणच आहे असा निष्कर्ष काढणेही चुकीचे आहे. त्यामागे इतर समस्याही असू शकतात. बालविवाह, कौमार्य चाचणी, बळजबरीने गर्भपात, हुंडाबळी, अंधश्रद्धेचे बळी असेही काही प्रश्न त्यामागे असू शकतात. बेपत्ता मुली आणि महिलांची संख्या वेगाने कमी करणे हे सरकारचे ध्येय असायला हवे आणि त्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याची तयारी ठेवावी लागेल. महिलांवरील अत्याचाराविरोधात कडक कायदे करू अशी आश्वासने देण्यात काही अर्थ नाही.

अत्याचारी घटनांना पायबंद घालण्यासाठी पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणांनी अतिशय जागरूकता दाखवत अत्याचार करणाऱ्यांना आपला धाक पोहोचू शकेल असा दरारा निर्माण करणे आवश्यक आहे. नुसते कायदे करून उपयोग नाही, कायद्याविषयी प्रबोधन व धाकही हवा. कायद्याचा धाकच राहिलेला नसल्याने विकृत लोकांची हिंमत वाढत चालली आहे. महिलांशी छेडछाड, असभ्य वर्तन, अत्याचार, अनैतिक कृत्ये केल्याने होणाऱ्या परिणामांची जाणीवच नसल्याने या विकृती मोकाट सुटल्या आहेत. त्यासाठी कायदेविषयक प्रबोधन समाजात आवश्यक आहे. महिलांच्या सन्मानाला शक्तिशाली अहंकारी वासनांध पुरुषाने एकट्याने किंवा सामूहिकरीत्या कुस्करून टाकावे यासारखे भयानक कृत्य आणि गुन्हा दुसरा कुठलाही नाही. जसजसा शोध आणि विज्ञानाच्या वाटेवर माणूस अधिकाधिक अत्याधुनिक होत चालला आहे तसतसे लोकांतील संस्कार आणि संस्कृती लोप पावत चालली आहे काय यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

ग्राहकांना जागृत करणे हेच अ.भा.ग्राहक पंचायतचे कार्य -डॉ.विलास मोरे

घनसावंगी । प्रतिनिधी

संत रामदास महाविध्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व अ.भा.ग्राहक पंचायत यांच्या विद्यमानाने ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अ.भा.ग्राहक पंचायचे मराठवाडा प्रांत प्रमुख डॉ.विलास मोरे,अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र परदेशी,प्रमुख पाहुणे म्हणून अ.भा.ग्राहक पंचायतचे जिल्हा सचिव डॉ.रमेश तारगे, समाजसेवक देवानंद चित्राल,उपप्राचार्य प्रा.मिरकट, अ.भा.ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष मारोती सावंत,प्रा.राऊत, प्रा.अवचार, प्रा.घोंगे, प्रा.गवळी,बाबासाहेब हेमके,मधुकर मुळे,नारायण मते,देवकाते,पत्रकार अविनाश घोगरे,बाळासाहेब ढेरे,राजेंद्र थोरात,बाबासाहेब गायकवाड,यांच्यासह अनेक पदाधिकारी,प्राध्यापक व विध्यार्थी

उपस्थित होते.

पुढे व्याख्यान प्रसंगी बोलताना डॉ.मोरे म्हणाले कि,व्यक्ती जन्मल्यापासून मरेपर्यंत ग्राहक असतो.त्यामुळे प्रत्येकाने आपल्या ग्राहक हक्काचा वापर करून आपला हक्क प्राप्त करावा तसेच ग्राहक सरक्षण कायदा हा भारत शासनाने अभ्यासक्रमात समाविष्ट केल्याने विध्यार्थ्यांने या कायद्याचा अभ्यास करून त्यानुसार समाजाच्या व स्वतःच्या ग्राहक हक्काचे सरक्षण करावे.त्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी अ.भा.ग्राहक पंचायतचे सभासदत्व स्विकारून आपल्या ग्राहक हक्कासाठी एक व्यासपीठ प्राप्त करावे.तसेच आपल्या संपूर्ण देशातील प्रत्येक जिल्ह्यात शासनाने ग्राहक सरक्षण आयोग न्यायालयामार्फत चालू केलेला असून तेथे आपली ग्राहक म्हणून फसवणूक झाल्यास पाच लाखपर्यंत मोफत तक्रार ग्राहकांना दाखल करता येते.तसेच डॉ.मोरे यांनी ग्राहक सरक्षण कायद्याविषयी विध्यार्थी यांना सखोल मार्गदर्शन केले.यावेळी प्रा.राऊत यांनी प्रास्ताविक केले.तर प्रा.घोंगे यांनी आभारप्रदर्शन केले.

बिखुरलेल्या कुंटूंबाना जोडण्यासाठी पुनःर्विवाह -हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

पति-पत्नी चे वैवाहिक जीवन घटस्फोटा मुळे, दोघांपैकी एकांचा निधना मुळे संपुष्टात येते. नवराच्या मृत्यु नंतर कुटुंबात महिलेला दुय्यम स्थान प्राप्त होते. महिला असो कि, पुरुष अशा व्यक्ति समाजा मध्ये आर्थिक, सामाजिक, भावानिक दृष्ट्या ते एकांकी पडतात. अशा प्रकारचे जीवन जगणार्या लोकांच्या व पुनःर्विवाह इच्छुकांसाठी सकल राजस्थानी मारवाडी समाजाच्या वतीने जैन, अग्रवाल, माहेश्वरी, ब्राह्मण इ. विधवा-विधुर, अपंग आणि घटस्फोटितांसाठी रविवारी दि. २५ अगस्त २०२४ रोजी जालन्यातील जैन भवन, सकलेचा नगर येथे पार पडलेले एक दिवसीय राज्यस्तरीय परिचय सम्मेलनला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र, पर राज्यातून त्याच बरोबर नेपाल, विदेशातुन जवळ पास २०० उमेद्वाराने

सहभाग नोंदविला. उमेद्वारा सोबत त्यांचे पालक इ. मान्यवर मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या मेळाव्याच्या माध्यमाने दिनदुःखी उमेद्वारांना जीवनसाथी मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहे. सकल राजस्थानी समाजाचा हा प्रथमच प्रयास आहे, त्याला भर-भरून प्रतिसाद मिळाला. प्रास्ताविक करताना हस्तीमलजी बंब म्हणाले मानव सेवा हीच ईश्वर सेवा आहे. उमेद्वारांचे जीवनात आनंद व त्यांच्या उज्जवल भविष्यासाठी सम्मेलनाचा उद्देश्य आहे. बिखुरलेल्या कुटूंबाना जोडण्यासाठी पुनःर्विवाह गरजेचे आहे असे बंब म्हणाले. कांतीलाल राठी मनोगत व्यक्त करताना आचार-विचार, संस्कृति असलेल्या मारवाडी समाजाच्या सर्व घटकांनी एकत्र येऊन या सम्मेलनाचा प्रथमच प्रयोग यशस्वी ठरविला आहे. काळाच्या प्रवाह बरोबर सर्वानाच बदलावे लागणार आहे. समाजात सध्या घटस्फोटितांचा गंभीर प्रश्न आहे, असे राठी म्हणाले. सुभाष देविदान आपले विचार मांडताना काही कारणामुळे एकांकी जीवन वाट्याला आलेल्यांना त्यांचे जीवन फुळविण्याचा हा मंच आहे. मारवाडी समाजात सर्व जातीच्या धर्माचा लोकांना एकजुट करने, संघटीत करने सुध्दा माध्यम आहे. आजच्या या राजस्थानी समाजाच्या विवाह इच्छुक उमेदवारांच्या हा सर्वात मोठा व अभुतपुर्व सम्मेलन ठरला आहे, असे देविदान म्हणाले. पुरुषोत्तम जयपुरिया म्हणाले अनेक जन जीवनसाथी मिळविण्यासाठी संघर्ष करतात, मात्र हे काम कठीन असून ते सोपे करण्यासाठी सकल राजस्थानी समाजाने एका छताखाली येऊन सर्वा समोर आदर्श ठेवला आहे. वधु-वर मेळावे, सामुहिक विवाह काळाची गरज आहे, असे जयपुरिया म्हणाले. कार्यक्रमाचा शुभारंभ दीप प्रज्वलन करून करण्यात आले सर्व उमेद्वारांच्या माहिती पुस्तक प्रकाशित करून निःशुल्क वितरण करण्यात आले. सम्मेलनात चहा, नाश्ता, जेवण, मंडप इ. सोयी वस्तु भंडार असोसिएशन तर्फे देण्यात आले. त्याबद्दल पुरुषोत्तम जयपुरिया, सुमीत सारस्वत, गोपाल झंवर, अलकेश अग्रवाल, संदीप चांडक इ. यांचे सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश उपाध्याय, नरेन्द्र मोदी, सतिष पंच, अभय सेठिया, विजय सुराणा, सुनिल बियाणी, संतोष करवा, ताराचंद मालपाणी, आकाश अग्रवाल, सुभाष सोनवणे, महिला आघाडीची सौ. विजया बोरा, ॲड. अश्विनी धन्नावत इ. नी परिश्रम घेतले. वधु-वरांची नोंदणी, ओळखपत्र, भेट वस्तु नोंदणी कक्षात संजय नागोरी, संतोष बाहेती, जुगलकिशोर होलाणी, शामसुंदर मंत्री, नंदलाल इंदाणी, सत्यनारायण मंत्री, धर्मेंद्र लखोटिया, बालाप्रसाद लोहिया यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन, उमेद्वारांचे साक्षात्कार कमलकिशोर मालपाणी, ज्योती करवा यांनी केले. शेवटी आभार पुरुषोत्तम जयपुरिया यांनी मांडले.

पान १वरून...

लाडक्या बहिणींनो पैसे घ्या

योजना आणली मात्र बहिणीच्या लेकरांचे काय? लाडक्या भाषेच्या आरक्षणाचे काय हे देखील सरकार सांगावे? तसेच लाडकी बहीण योजना आणली मात्र लाडक्या बहिणीच्या मेव्हण्याच्या शेतीच्या भावाचे काय? असे ते म्हणाले. भांडण लावण्याचे काम देवेंद्र फडणवीस करत आहेत. मराठा समाजाचे हैदराबादला साडेतीन हजार कुणबी नोंदीचे रेकॉर्ड सापडले असून त्याची तपासणी करण्यात यावी अशी मागणी गेल्या अनेक दिवसापासून करत आहे. हे रेकॉर्ड सापडल्याची कबुली मंत्री शंभूराजे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. मात्र हे होऊ नये असे देवेंद्र फडणवीस यांना वाटत असल्याचे देखील मनोज जरांगे यांनी म्हटले.

शिवाजी महाराज पुतळाप्रकरणी

आरोप करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या तक्रारीनंतर, स्ट्रक्चरमध्ये गंजलेले नट आणि बोल्ट सापडले असून, कंत्राटदार जयदीप आपटे आणि स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या अनेक कलमांतर्गत मिलीभगत, फसवणूक आणि सार्वजनिक सुरक्षा धोक्यात आणल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी कंत्राटदार जयदिप आपटे आणि स्ट्रॅक्चरल सल्लागार डॉ.चेतन पाटील यांच्या विरोधात भारतीय न्याय दंडसंहिता कायद्यातंर्गत कलम १०९, ११०, १२५, ३१८, ३ (५), ३ या विविध कलमाखाली गुन्हा दाखल दाखल करण्यात आला आहे. हा पुतळा नौदल डॉकयार्ड येथून निविदा

काढून पुतळ्याचे काम देण्यात आले होते. दरम्यान, जयदीप आपटे हे ठाणे शहरातील रहिवाशी असून त्यांचा मुख्यमंत्री शिंदे यांचे सुपुत्र तथा कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्याशी जवळचे संबध असल्याची चर्चा असून, या संबंधातूनच शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याचे कंत्राट देण्यात आल्याची चर्चाही राजकिय वर्तुळात सुरु आहे.

आशा स्वयंसेविका आणि

व गटप्रवर्तक यांच्या कामाचे स्वरूप विचारात घेवून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांचा कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू आल्यास रु.१०.०० लक्ष व कायमस्वरुपी अंपगत्त्व आल्यास रु.५.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

गुजरातमध्ये पावसाचा

आणखी पुढील दोन दिवस राज्यातील अनेक भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. २९ ऑगस्टपर्यंत राज्यात रेड अलर्ट जारी केला आहे. या काळात जोरदार वारे वाहतील आणि मुसळधार पाऊसही पडेल, असे विभागाने म्हटले आहे. मागील २ दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे राज्यातील सर्व प्राथमिक शाळांना मंगळवारी (२७ ऑगस्ट २०२४) सुट्टी जाहीर केली आहे.

कोलकातामध्ये

छेडले आहे. या आंदोलनाला नबन्ना अभिजन असे नाव दिले असून, विद्यार्थ्यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या कालीघाट निवासस्थानाजवळही सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. तसेच नबन्ना अभियानादरम्यान मोठ्या प्रमाणावर हिंसाचार घडवण्याचा कट रचल्याचा आरोपाखाली चार विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली आहे, असे कोलकाता पोलिसांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, १० ऑगस्टपासून या घटनेचा निषेध करणारे डॉक्टर आणि डाव्या विद्यार्थी संघटनांनी नबन्ना अभियान निषेध मोर्चात सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मातंग समाजाच्या वतीने अविनाश खंडागळे शहीदास श्रद्धांजली

परतूर । प्रतिनिधी

दिनांक १ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं ऐतिहासिक निर्णय देत / प्रवर्गात वर्गीकरण करण्यास मान्यता दिली होती या अनुषंगाने राज्य शासनाने तात्काळ राज्यात आरक्षण वर्गीकरण लागू करायला हवे होते परंतु शासनाच्या आणि विरोधी पक्षांच्या उदासीन धोरणामुळे आरक्षण वर्गीकरनास विलंब लागत आहे या कारणाने दिनांक २५ रोजी धाराशिव जिल्ह्यातील अविनाश खडांगळे या तरुणाने आत्महत्या करून आपले जीवन संपवले या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील परतूर सकल मातंग समाजाच्या वतीने अविनाश खंडागळे शहीदास श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दरम्यान मातंग संघ तालुका अध्यक्ष इंद्रजित हिवाळे यांनी शोक व्यक्त करीत बोलतांना म्हंटले की,गेल्या अनेक दाशका पासून मातंग समाजाचा आरक्षण वर्गीकरनाचा प्रश्न प्रलंबित असून याकरीता लोकशाहीच्या माध्यमातून समाजाने राज्यभर शांततेच्या मार्गाने महामोर्चे काढले, विविध मार्गाने आंदोलने केली.वर्गीकरन आरक्षणाची रास्त मागणी मान्य न करता केवळ चालढकल करण्याची सरकारची आणि विरोधी पक्षांची भूमिका चालू आहे आता ही खेळी आम्ही आता चालू देणार नाही,संयमाचा अंत या सरकारने आणि विरोधी पक्ष नेत्यांनी पाहू नये, आरक्षण वर्गीकरन युवकांच्या मनातील हुंकार आहे, एक अंगार आहे. आता या मागण्या मान्य होईपर्यंत समाजातील युवक मरणार नाही तर लढणार आहेत तरुणांनी टोकाचे पाऊल उचलू नका आपल्याला लोकशाहीच्या मार्गाने लढा जिंकायचा आहे आणि तो आपण जिंकणारच आहोत.

शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची तात्काळ आमालबजावणी करून आयोग गठित करून / प्रवर्गाचे वर्गीकरण करून अतीवंचित उपेक्षित जातींना न्याय द्यावा.अशी भावना इंद्रजित हिवाळे यांनी व्यक्त केली याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती परतूर चे संचालक विजय वाणी श्रावण मालक हिवाळे अश्रुबा गायकवाड बाबासाहेब हिवाळे दगडू मामा संतोष सुतार घोडे शेषराव हिवाळे अरुण सदावर्ते दत्ता हिवाळे अनिल हिवाळे प्रदीप फुलमाळी अशोक काळे गजानन कापसे सुरेश गव्हारे अनिल थोरात विकास धोत्रे रामा हिवाळे अशोक काळे नरेश हिवाळे व अन्य समाज बांधव उपस्थित होते.

सोहम वायाळ यांची मुंबईत राज्य कामगार संचालक पदीवर बदली

जालना । प्रतिनिधी

येथील निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांची मुंबईत राज्य कामगार विमा योजनेच्या संचालकपदी प्रतिनियुक्ती झाल्यामुळे ते सोमवारी रुजू झाले. त्यांच्या जागेवर शासनाने अद्याप कुणाचीर्ची नियुक्ती न केल्यामुळे प्रभारी पदभार शशिकांत हदगल यांच्याकडे देण्यात आला आहे. दरम्यान, हदगल यांनी पदभार स्वीकारला.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नियम, १९८१ च्या नियम-४० मधील परिशिष्ट-२ मधील विहित अटी व शर्तीना अधीन राहून श्री. सोहम वायाळ, निवासी उप जिल्हाधिकारी यांची संचालक (प्रशासन), राज्य कामगार विमा योजना, मुंबई या पदावर ३ वर्षांच्या कालावधीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.श्री. सोहम वायाळ, उप जिल्हाधिकारी यांनी प्रतिनियुक्तीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर रुजू होण्यासाठी पुढील सूचनांसाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे हजर व्हावे. असे आदेशामध्ये करण्यात आले आहे

अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून ६,६०,००० रुपये किमतीचे गोवंशी जनावरे व गोवंशीय मास जप्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या पथकाने आंबेजोगाई येथे चालत असलेल्या अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून ६,६०,००० रुपये रुपये किमतीचे गोवंशी जनावरे व गोवंशीय मास जप्त करत धडाकेबाज कामगिरी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की आज दिनांक २७. ८.२०२४ रोजी अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम यांना माहिती मिळाली की आंबेजोगाई शहरांमधील बाराभाई गल्ली येथे काही इसम गोवंसीय जनावरांची कत्तल करून त्यांची मांसाची विक्री करत आहेत. तसेच सदर ठिकाणी काही गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी आणून ठेवलेली आहेत. सदर माहितीच्या अनुषंगाने त्यांनी तत्काळ अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस स्टेशन आंबेजोगाई शहर व ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांनां आदेशित करून त्या ठिकाणी जाऊन छापा मारण्यास सांगितले सदर ठिकाणी जाऊन छापा मारला आसता त्यांना काही इसम गोवंशीय जनावर खाली पाडून त्याची कत्तल असताना मिळून आले. सदर अधिकारी आणि कर्मचारी यांनी त्यांना पकडून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी मिरार इब्राहिम कुरेशी, तोफिक लायक कुरेशी, अरबाज नवीन कुरेशी, असीम नाजीर कुरेशी,मुक्तार सतार कुरेशी सर्व रा. बाराभाई गल्ली अंबाजोगाईअसे सांगितले व त्या ठिकाणाहून पाच जण पळून जाण्यात यशस्वी झाले त्यांची नावांची चौकशी केली असता ते पुढील प्रमाणे मोहम्मद युनुस कुरेशी, नाजीर कुरेशी, लोकमान अजीम कुरेशी,फारुख शेरू कुरेशी, राजू नाजर

अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या पथकाची कारवाई

कुरेशी असे समजले वरील आरोपीताकडून एकूण सहा लाख साठ हजार रुपयांचा गोवंशी मौस व ११ गोवंसीय जनावरे तसेच पाच मोटरसायकल एक तीन चाकी मालवाहू पिवळ्या रंगाचा ऑटो व व एक बजाज कंपनीचा कळ्या रंगाचा तीन चाकी आटो मिळून आले असा मुद्देमाल पंचा समक्ष जप्त केला. सदर ठिकाणी अकरा गोवंशी जनावरे हे गोशाळेत सोडून व मिळालेले बाराशे किलो वजनाचे मांस हे नगरपरिषद साह्याने नष्ट केले . सदरची कारवाई अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि विनोद घोळवे तसेच अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोह राठोड, पोहो अनिल दौंड, रामेश्वर सुरवसे, राजू पठाण,तानाजी तागड त्याचबरोबर पोलीस स्टेशन आंबेजोगाई शहर येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे, पोलीस उपनिरीक्षक पवार,, त्याचबरोबर आंबेजोगाई ग्रामीण येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप आंबेजोगाई पोलीस स्टेशन शहर येथील गुट्टे नागरगोजे, चादर, त्याचबरोबर आंबेजोगाई ग्रामीण येथील खंदारे देशमाने मुरकुटे राऊत यांनी केली. सदरच्या आरोपीतांवर आंबेजोगाई शहर येथे कलम ३२५ कलम २७१ भारतीय न्याय संहिता व सह कलम ११ एक डी ११(१) ई प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० व व महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५(१),५( )२,५() ९, ११,६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११९ प्रमाणे गुन्हा नोंद झाला आहे.

गटशिक्षणाधिकारी अशोक सोळुंके व माने यांना लाच घेताना पकडले

मंठा । प्रतिनिधी

अशोक बापूराव सोळंके वय ४६ वर्ष,विस्तार अधिकारी शिक्षण (वर्ग-३)चार्ज गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती मंठा. व तसेच रामदास यादवराव माने व्यावसाय विषय तज्ञ (कंत्राटी) गट शिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती मंठा. रा. पंचायत समिती क्वार्टर मंठा. दोघांना लाच घेतानी आज पकडण्यात आली आहे. लाच मागणी रक्कम ५००० रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ४५००/- रुपयाची मागणी केली. याबाबत तक्रारदार यांच्या नातीस ब्राईट इंग्लिश स्कूल मंठा या ठिकाणी इयत्ता पहिली मध्ये ऍडमिशन घ्यायचे असल्याने तक्रार यांनी त्यांच्या नातीचा महाराष्ट्र शासनाचे पूर्व प्राथमिक प्राथमिक केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २००९ प्रमाणे फॉर्म भरल्याने तक्रारदार याचे नातीची २५ % शासकीय कोठया मधून निवड झाली. त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे नातीचे ॲडमिशन करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालय मंठा यांचे कडून सर्व कागदपत्रे तपासून त्याबाबत एनओसी आवश्यक असल्याने तक्रार यांनी त्यांची कागद पत्रे गट शिक्षणाधिकारी कार्यालयात दाखल केली. त्यानंतर तक्रारदार हे गट शिक्षणाधिकारी कार्यालयात आलोसे क्रमांक २ यांना भेटले. त्यावेळी आलोसे क्र. २ यांनी तक्रारदार यांचेकडे आलोसे क्रमांक ०१ यांच्यासाठी ५०००/- रुपयांची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी आज दिनांक २७. ०८.२०२४ रोजी अँटी करप्शन ब्युरो जालना येथे दिली. सदर तक्रारीवरून आज दि. २७.०८.२०२४ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आलोसे क्रमांक २ यांनी तक्रार यांच्याकडे पंचा समक्ष ५०००/- रुपयांची मागणी करून आलोसे क्रमांक ०१ यांच्या समक्ष तडजोडी अंती ४५०० रुपये लाचेची रक्कम तक्रार यांना घेऊन येण्यास सांगितले असता आज रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्रमांक ०२ यांना लाचेची रक्कम ४५००/- रुपये तक्रारदार यांचे कडून स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे.आरोपी क्रं १ व २ यांना ताब्यात घेतले आहे. त्यांचे विरुद्ध मंठा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.नवीन पोलीस उप अधीक्षक श्री बाळु जाधवर, यांनी आजच पदभार स्वीकारला आहे. आणि पहिल्याच दिवशी त्यांचे मार्गदर्शनाखाली ट्रॅप कारवाई करण्यात आली आहे.

टी.सी.हरवला आहे

अंबड जालना प्रवासाच्या दरम्यान सावित्र सोमनाथ वैद्य रा.अंबड या विद्यार्थिनीची नववी पासचा टीसी ओमशांती विद्यालय अंबड जि.जालना येथील शाळेची टीसी ची मूळ प्रत हरवली आहे तरी कोणाला प्राप्त झाल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधवा. संपर्क : ८७६६०७५०१

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.२८ ऑगस्ट २०२४

मनोज जरांगे पाटील ८ सप्टेंबर रोजी परळीत

परळी : मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मतदार संघनिहाय घोंगडी बैठका होत आहेत. रविवार दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी परळी येथे घोंगडी बैठक होणार आहे. त्यासाठी पूर्वतयारी ची बैठक श्रद्धा मंगल कार्यालय, परळी वैजनाथ येथे पार पडली. या बैठकीमध्ये घोंगडी बैठकीच्या तयारीसाठी ज्या प्रकारे नियोजन करावे लागणार आहे त्याबद्दल समाज बांधवांनी विस्तारित चर्चा व विचारविनिमय केला. दरम्यान परळी मतदारसंघातील समाजातील लहान थोर, वडीलधारी मंडळी, महिला यांनी सहभागी व्हावे तसेच या विषयी प्रचार प्रसार करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या असून ही घोंगडी बैठक समाजाला दिशा देणारी असेल असा विश्वास या प्रसंगी समाज बांधवांनी व्यक्त केला. पूर्वनीयोजन बैठकीचे आयोजन श्रद्धा मंगल कार्यालय पावर हाऊस समोर येथे करण्यात आले होते. परळी मतदार संघातील मराठा समाजातील बांधव मोठ्या संख्येने या बैठकीला उत्स्फूर्तपने उपस्थित होते.

आमच्याकडे येऊन शारिरीक भूक भागवा, पण बलात्कार करू नका

कोलकाता । वृत्तसेवा

कोलकाता या ठिकाणी ९ ऑगस्टला झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेने सगळा देश हादरला. यानंतर पीडितेला न्याय मिळावा म्हणून आंदोलन करण्यात आले. आता याच कोलकाता या ठिकाणी असलेल्या सोनागाछी या ठिकाणी शरीर विक्री करणा-या महिलांनी आमच्याकडे आपली शारीरिक भूक भागवा पण बलात्कार करू नहा असे आवाहन केले आहे. या प्रकरणात आरोपी संजय रॉयला अटक करण्यात आली आहे. त्याची लाय डिटेक्टर टेस्ट आणि पॉलिग्राफ टेस्ट करण्यात आली.

९ ऑगस्टला सकाळी एक महिला डॉक्टर आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातल्या सेमिनार हॉलमध्ये मृतावस्थेत आढळली. तिचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत होता. तिच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले तेव्हा तिच्यावर बलात्कार झाला असल्याची बाब समोर आली. तिच्या शरीरावर आणि गुप्तांगावर अनेक जखमा होत्या. तिच्या डोळ्यांमधूनही रक्त वाहात होतं अशीही माहिती समोर आली. त्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या मुलीला न्याय दिला पाहिजे अशी मागणी होते आहे.

अत्यंत क्रूर पद्धतीने तिची हत्या करण्यात आली. त्याआधी तिच्यावर पाशवी बलात्कार

करण्यात आला. या प्रकरणात आरोपी संजय रॉयला पोलिसांनी अटक केली आहे. यानंतर सोनागाछी येथील देहविक्री करणा-या महिलांनी एक महत्त्वाचे आवाहन केले आहे. सोनागाछी हा कोलकाता येथील रेड लाईट एरिया आहे. या ठिकाणी देहविक्री करणा-या महिलांनी कोलकाता बलात्कार आणि हत्याकांडाचा निषेध केला आहे. त्या महिलांनी या घटनेविरोधात निदर्शने केली आणि त्यांना या घटनेबाबत काय वाटते ते माध्यमांना सांगितले.

काय म्हटले आहे सोनागाछीतल्या महिलांनी?

देहविक्री करणारी महिला म्हणाली, ''तुमच्या शरीराची भूक इतकी उफाळून आली असेल तर खुशाल सोनागाछीला या, तुमची भूक भागवा. पण कृपा करुन कुठल्याही मुलीचे किंवा महिलेचे शोषण करु नका तसेच कुणावरही बलात्कार करु नका. देहविक्री करणा-या इतर महिलांनीही अशाच प्रकारे मतप्रदर्शन केले आहे. ९ ऑगस्टच्या दिवशी ट्रेनी डॉक्टरचा मृतदेह आर. जी. कर रुग्णालयात आढळला होता. या मृतदेहावर अनेक जखमा होत्या. या पीडितेच्या शवविच्छेदनानंतर तिच्यावर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर देशभरात संतापाची तीव्र लाट उसळली.

खानकाहे कादरियाचे सज्जादानशिन हजरत आतिफ मिया यांचे आगमन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

भारतातील ८०० वर्ष प्राचीन खानकाह खानकाहे कादरिया बदायूं शरीफ (यू.पी.) चे सज्जादा नशिन व भारतातील प्रसिद्ध इस्लामिक विद्वान व तत्वज्ञते अल्लामा व मौलाना हज़रत अब्दुल गनी मोहम्मद आतिफ मियाँ कादरी उस्मानी अजहरी बदायूंनी हे बुधवार २८ ऑगस्ट रोजी मस्जिद व दर्गा हजरत फक्त शाह बुखारी (रहे.) आष्टी जि. बीड येथे मगरिबच्या नमाज़ नंतर ७:३० वा. उपस्थित राहुल ह.मोहम्मद पैगंबर (स.) यांच्या जीवन चरित्रवर प्रवचन देणार आहे. बीड जिल्ह्याच्या या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये हज़रत साहेब २९ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ११ ते १२ या वेळी हाजी सय्यद रिज़वान कॉन्ट्रॅक्टर ज़म ज़म कॉलोनी बीड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देणार आहेत. तसेच त्यांच्या घरी आलेल्या पाहुण्यांना भेटणार असून त्यांच्याशी हितगुज करणार आहेत.

मा.हजरत साहेब आष्टी येथे शेख अब्दुल बाकी कादरी यांच्या निवासस्थान ''कादरी व्हिला'' येथे मुक्कामास राहणार असून दिनांक बुधवार २८ रोजी सकाळी ११ ते १२ व संध्याकाळी साडेपाच ते सात यादरम्यान त्यांच्या अनुष्ठान भेटीचा लाभ आष्टीच्या रहिवाशांना घेता येणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी व्हाट्सअप क्रमांक ९४ २२ ५९ १२ १३ या क्रमांकावर संपर्क साधावा .

ड्रोनद्वारे पीक संरक्षण औषध फवारणी फायदेशीर -डॉ.मोटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सद्यस्थितीत ऊस पिकाचे कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन करून उसाची चांगली वाढ होण्यासाठी व जाडी वाढवण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि. रांजणीचे चेअरमन व कार्यकारी संचालक कृषिरत्न बी बी ठोंबरे यांच्या संकल्पनेतून कारखान्याने सभासद आणि बिगर सभासद शेतकऱ्यांसाठी ऊस पिकाची ड्रोनद्वारे फवारणी करण्याची योजना आखण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत नॅचरल शुगर मार्फत नोंदणीकृत शेतकऱ्यांचा ऊस फवारण्याकरिता भाडेतत्त्वावरील ड्रोन फवारणीसाठी ५० टक्के अनुदान देण्यात येत आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाची दखल घेऊन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक डॉ तुकाराम मोटे यांनी फवारणीचे प्रात्यक्षिक पाहणी करून डॉ मोटे यांनी उपस्थित

धानोरा खुर्द येथे ड्रोनद्वारे ऊस पीक फवारणीचे प्रात्यक्षिक संपन्न

नॅचरल शुगरकडून भाडेतत्त्वावर अनुदान स्वरूपात ड्रोनद्वारे फवारणी सुविधा

शेतकऱ्यांना ड्रोनच्या साह्याने फवारणीचे फायदे त्याचप्रमाणे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे निर्मित वसंत ऊर्जा, हरितके, बीव्हीएम या जैविक निविष्ठांचा वापर शेतीमध्ये केल्यामुळे होणारे फायदे संदर्भात माहिती दिली. नॅचरल शुगरचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी ड्रोन फवारणी करीत असताना त्याचा उडण्याचा वेग साधारणतः ४.५ ते ५.० मीटर प्रति सेकंद एवढा असतो त्यामुळे कमी वेळेत जास्त फवारणी क्षेत्र होते. प्रती एकर निविष्ठा मात्रा प्रचलित पद्धतीने फवारणी करीत असताना जेवढी असते तेवढीच वापरावी. मात्र पाण्याचे प्रमाण पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत प्रती एकर ८ लिटर, व पिकाच्या संपूर्ण वाढीच्या अवस्थेत अथवा दाट वाढणाऱ्या पिकामध्ये प्रती एकर १० ते १२ लिटर एवढे लागते. फवारणी करीत असताना तापमान ३५ ते ४० अंश सेल्सिअस पेक्षा कमी, आर्द्रता ४५ ते ५५ टक्क्यांपेक्षा जास्त व वाऱ्याचा वेग ३ ते ३.५ मीटर प्रतिसेकंद पेक्षा कमी असावा. पाऊस असताना फवारणी करू नये या तांत्रिक बाबींची माहिती देऊन फवारणीसाठी तयार करावयाचे द्रावण याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण करून दाखवले. यावेळी तालुका कृषी अधिकारी सुरेश ढाकणे, मंडळ कृषी अधिकारी विजयकुमार पवार, कृषी सहाय्यक पंडित काकडे, ज्ञानेश्वर कदम, जयपाल कचरे, अनिल तट, अंकुश निलेवाड, वैभव भिसे तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१५ वर्षात न सुटलेला रस्त्याचा प्रश्न दोन दिवसात मार्गी लावला-सतीश घाटगे

घनसावंगी । प्रतिनिधी

तालुक्यातील निपाणी पिंपळगाव येथील शेतकरी १५ वर्षांपासून शेत रस्त्याअभावी त्रस्त होते. दोन दिवसापूर्वी त्यांनी सतीश घाटगे यांची भेटू घेऊन आपला प्रश्न मांडला. या शेतकऱ्यांचा प्रश्न दोन दिवसात घाटगे पाटलांनी मार्गी लावला असून समृद्धी कारखान्यांमार्फत स्वखर्चातून हा रस्ता तयार करून दिला आह

निपाणी पिंपळगाव येथील शेतकऱ्यांना अरुंद रस्त्याअभावी शेती करता येत नव्हती. हा रस्ता झाल्यास आमची जीवनवहिनी सुरू होईल, अशी माफक अपेक्षा त्यांनी सतीश घाटगे यांच्याकडे व्यक्त केली होती. १५ वर्षात होऊ न शकलेले हे काम दोन

दिवसात घाटगे पाटील यांनी मार्गी लावले. त्यामुळे शेतकरी आनंदी झाले. त्यांनी आनंद व्यक्त करत सतीश घाटगे यांचे आभार मानले. समृद्धी कारखाण्यामार्फत स्वखर्चातून तयार झालेला हा रस्ता भविष्यात खडीकरण करून मजबूत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. या रस्त्यासाठी स्थानिक कार्यकर्ते भाऊसाहेब ढेंबरे आणि माऊली ढेंबरे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. यावेळीविठ्ठल गोल्ड,रावसाहेब बिरणावळे ,अर्जुन बिरणावळे ,भाऊसाहेब बिरणावळे ,अशोक बिरनावळे,आकाश बिरणावळे, सुदाम बिरणावळे,सचिन बिरणावळे,अमोल गव्हाणे, नामदेव गव्हाणेउपस्थित होते.

आरोग्य कर्मचाऱ्यांचा जालना येथे सन्मान

मंठा । प्रतिनिधी

सन २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रम मध्ये उलेखनीय कामगिरी करणारेक प्राथमिक आरोग्य केंद्र ढोकसाळ चे आरोग्य आरोग्य कर्मचारी सुजीत वसंतराव वाघमारे ,आरोग्य सेविका श्रीमती बबिता केसकर, आशा सेविका सुनिता काष्टे यांनी राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रम मध्ये २०२३-२४ उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे त्या मुळे जालना येथे त्यांचा सन्मान करून पुरस्कार प्रदान करण्यात आला . श्री सुजीत वसंतराव वाघमारे यांना हा पुरस्कार संलग्न ७ वे वर्षीत मिळाला आहे.हा पुरस्कार जिल्हा परिषदेच्या

मुख्यकार्यकारी श्रीमती वर्षी मिना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ जयश्री भुसारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .यावेळी डॉ भुसारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की वाढती लोकसंख्या ही भारत देशापुढे मोठी समशा आहे त्या मुळे वाढते लोकसंख्येला आळा घालणेसाठी कुटुंब नियोजन हा उत्तम पर्याय आहे यामुळे इतर ही आरोग्य कर्मचाऱ्यांनी असेच काम करावे या सर्व पुरस्कार प्राप्त आरोग्य कर्मचाऱ्यांचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ अमोल भताने वैद्यकीय अधिकारी डॉ कांचन कांगणे यांच्या सह तालुक्यातील सर्व आरोग्य कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को- ऑप क्रेडीट सोसायटीस मार्च अखेर ९९ लाखांचा निव्वळ नफा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को -ऑप क्रेडिट सोसायटी लि.ला मार्च २०२४ अखेर रुपये ९९ लाखाचा निव्वळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी संस्थेचा २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचा अहवाल सादर करताना बोलत होते. समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती हेच या संस्थेचे ध्येय धोरण असल्याचे नमूद करत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संस्थेच्या सर्व सभासदांसमोर आपला ११ वा वार्षिक अहवाल अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी समोर ठेवला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांच्यासह संस्थेचे सर्व सन्माननीय संचालक उपस्थित होते.

संस्थेचा ११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्वप्रथम शहराचे आराध्यदैवत श्री योगेश्वरी देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनंतर आर्थिक वर्षात निधन झालेल्या संस्थेच्या ग्राहक व हितचिंतकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. संस्थेचे शाखा व्यवस्थापक संतोष ढगे यांनी मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर केले. वार्षिक सभेपुढे येणाऱ्या विविध विषयांवर चर्चा होऊन त्यास मंजूरी घेण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात रिकबचंद सोळंकी यांनी संस्थेस मिळालेल्या या अभूतपूर्व यशाचे श्रेय हे श्री योगेश्वरी मल्टिस्टेट चे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शन व प्रेरनेला दिले. तसेच मल्टिस्टेटचे उपाध्यक्ष शेख अन्वर हुसेन शेख वली हसन ,संचालक सुधाकर टेकाळे , ऍड विलास लोखंडे, ऍड लोमटे अनिल संभाजीराव , विलास सिद्राम जाधव , भागवत रामकृष्ण मसने , संकाये अप्पासाहेब त्रिंबकआप्पा, तसेच संचालिका , श्रीमती आशालता विश्वजित वांजरखेडकर , सौ. खडके मंदाकिनी बाजीराव, तज्ञ संचालक सचिन लक्ष्मीकांत बजाज ,आणि कांतीलाल नंदलाल शर्मा यांच्यासह संस्थेचे सभासद ग्राहक , ठेवीदार ,आणि कर्जदार यांना दिले. योगेश्वरी मल्टिस्टेट चे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी २०२४ चा

वार्षिक ताळेबंद देतांना प्रथमतः त्यांनी संस्थापक , मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांचे संस्थेने ११ वर्ष यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.सर्व सभासद , ग्राहक ,आणि संस्थेच्या हितचिंतकांचे देखील आभार याप्रसंगी व्यक्त केले . सध्याच्या काळात अनेक बँका , पतसंस्था , मल्टिस्टेट सोसायटी , अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. तर काही दिवाळखोरीत निघाल्या आहेत.असे असताना देखिल श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी ही नेत्रदीपक कामगीरी करत असल्याचे आनंदाने सांगितले . यात संस्थेच्या ग्राहकांचा , ठेवीदारांचा , खातेदार आणि हितचिंतक यांचा मोलाचा वाटा असल्याचे देखील सोळंकी यांनी आवर्जून स्पष्ट केले .

पुढे संस्थेच्या आर्थिक विवेनचनात मार्च २०२४ अखेर १७२२ सभासद असल्याचे सांगितले .संस्थेचे भाग भांडवल एकूण ६२ लाख रुपये असल्याचे स्पष्ट केले . तसेच मार्च २०२४ अखेर संस्थेकडे एकूण ठेवी रुपये २३ कोटी एवढया असून संस्थेच्या वतीने सभासद व ग्राहकांना एकूण कर्जवाटप हे रुपये १९ कोटी एवढे झाले असल्याचे यावेळी नमूद केले .संस्थेची एकूण गुंतवणूक अंबाजोगाई पिपल्स बँक रुपये ०७ कोटी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्था २ कोटी, आदर्श मल्टिस्टेट परळी ३७ लाख, त्याचबरोबर आदर्श नागरी सहकारी पतसंस्था ३७ लाख रु एवढी असून एकूण ९ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी सांगितले.संस्थेचे लेखा परीक्षण मे अंकित जैस्वाल यांनी करत अहवालात संस्थेचा एन पी ए हा ३.१९ एवढा दाखवण्यात आला आहे . त्याचबरोबर आर्थिक वर्ष मार्च २०२४ अखेर श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेने ९९ लाख रुपये एवढा निवळ नफा मिळविला असल्याचे आवर्जून सांगितले. तर संस्थेच्या सर्व सभासदांना १०% लाभांश देण्याचे याप्रसंगी जाहीर केले. आजमितीला संस्थेच्या मुख्यालयात ७ कर्मचारी आणि २ नित्य निधी ठेव प्रतिनिधी कार्यरत आहे. यामध्ये शाखा व्यवस्थापक संतोष ढगे, प्रदीप काकडे, विष्णु गुजर ,उमेश साखरे आणि अंकुश माने यांचा समावेश आहे . अंबाजोगाई आणि बसवकल्याण अश्या दोन शाखा ग्राहकांना सेवा देत असल्याचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी सांगितले.

पान ६ वरुन...

शहीद पत्रकार शोयब उल्लाखान

शोएब उल्ला खान यांची भूमिका महत्त्वाची होती .म्हणून त्यांच्यावर हल्ला करून त्यांना शहीद करण्यात आले. त्यांनी या लढ्यात आपले जीवन समर्पित केले. त्यांच्या स्मृती वृक्ष रूपाने जागृत ठेवाव्यात म्हणून वृक्षारोपण करून त्यांना मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नवनाथ गायकवाड, राहुल घाडगे, सुरेश जंगले ,प्रकाश राठोड व जावळे यांनी प्रयत्न केले

उपमुख्यमंत्री ना.अजित दादा

की, ना.अजितदादा पवार यांनी सर्व समाजासाठी कोणकोणत्या अभिनव योजना देऊ केल्या, त्याची माहिती देण्यासाठी जनसन्मान यात्रा काढली आहे. त्यांच्या जनसन्मान यात्रेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. माझी लाडकी बहिण योजनेतून राज्यातील करोडो महिलांच्या बँक खात्यात दोन महिन्यांची रक्कम जमा झाली आहे. याव्यतिरिक्त मुलींच्या उच्च शिक्षणाचा १०० टक्के खर्च सरकार उचलणार आहे. ५२ लाख कुटुंबांना वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. तसेच शेतकरी बांधवांसाठी वीज बिल माफ केले आहे. विद्यार्थांना आणि पदवीधर तरुणांना प्रशिक्षण भत्ता देण्यात येत हे. यासह अनेक योजना राबविण्यात येणार आहे. याबद्दलची माहिती नागरिकांना देण्यासाठी अजितदादा यांनी जनसन्मान यात्रा काढली असून बीड मतदारसंघात देखील ही जनसन्मान यात्रा येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी दिली.

राज्यभरात सुरू असलेली जनसन्मान यात्रा बीड मतदारसंघात गुरुवार, दि.२९ ऑगस्ट २०२४ रोजी, सकाळी ९.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे दाखल होत असून या यात्रेची सभा आयोजित करण्यात आली असून उपमुख्यमंत्री अजित पवार विविध घटकातील नागरिक, महिला भगिणींशी संवाद साधणार आहेत. यावेळी नगर रोडवरून दुचाकी रॅली देखील काढण्यात येणार आहे. त्यांनतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येईल. ठिकठिकाणी अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच विविध ठिकाणी असल्याचे भव्य स्वागत करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी सांगितले.

यात्रेच्या स्वागताची जय्यत तयारी : डॉ.योगेश क्षीरसागर

कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्यासह पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, खा.प्रफुल्ल पटेल, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहेत. यात्रेच्या भव्यदिव्य स्वागताची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

खोलेश्वर महाविद्यालयाच्या

यावेळी त्यांनी अंबाजोगाई सेक्टरच्या कामाचा आढावा घेऊन अंबाजोगाई सेक्टर चे काम अतिशय उत्तम चालू आहे असे म्हणून अंबाजोगाई सेक्टर चे सेक्टर कमांडर कॅप्टन सुंदर खडके व इतर सहकारी यांचे कौतुक केले.यावेळी ७ गर्ल्स महाराष्ट्र बटालियनच्या लेफ्टनंट डॉक्टर पन्हाळे मॅडम योगेश्वरी देवस्थानचे विश्वस्त अमोल लोमटे व त्यांचे सर्व सहकारी यांची उपस्थिती होती.

अंभोरा पोलिस स्टेशन यांच्या

विद्यमान सरपंच श्री भरत आबा जाधव यांनीही आपल्या भाषणातून पालकांना उद्देशून एक वेळेस संपत्ती कमी कमवा पण मुलांना संस्कार चांगले द्या तीच आपली खरी संपत्ती आहे तर विद्यालयातील शिक्षक श्री अमोल तांदळे सर सरांनी आपल्या आभार व प्रस्ताविक भाषणातून राज्यात व देशात रोजच घडणाऱ्या लैंगिक अत्याचार व बलात्कार सारख्या घटनांच्या बातम्या पाहून चिंता व्यक्त केली याच कार्यक्रमांमध्ये नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत सरस्वती विद्यालयातील विद्यार्थिनींचा संघ दुतिय आल्याने श्री साळवे साहेब यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला गावचे माजी उपसरपंच श्री नंदकुमार फसले आयडियल इंग्लिश मीडियम चे संस्थापक अध्यक्ष श्री सिताराम जाधव सर, जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक श्री कुठे सर ,मुख्याध्यापक नंदकुमार वाणी सर, मुख्याध्यापक असलम खान सर, मुख्याध्यापक वाणी रावसाहेब सर, आयडियल इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना वाळके मॅडम व सर्व शाळेतील शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित आदिनाथ मेजर, शौकत मेजर, आदिनाथ जाधव, खंडू इथापे ,शामद खान ,मुजीब खान ,लियाकत खान ,मुरलीधर कोहक , कानिफनाथ फसले आदी महिला व पालक, आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल, दौलावडगाव अंर्तग़त सर्व जि.प. शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण

यामुळे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या वरील ताणतणाव कमी होईल व शिक्षक वृन्दाचे संपूर्ण लक्ष विद्यार्थ्यांच्या अध्यापणावर केंद्रित होईल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही अशा आशयाच्या मागणीचे निवेदन मा गटशिक्षणाधिकारी अंबाजोगाई यांना शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आले आहे. या निवेदनावर शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष रापतवार विजय, उपाध्यक्ष नरवडे पांडूरंग ,सचिव विष्णू सरवदे, कोशाध्यक्ष साधू गायकवाड, उमेश नाईक, दत्ता देवकर, दरवेशवार एन डी, पोपळघट अशोक,अनुराथ बांडे, माने बाळासाहेब, मोरोपंत कुलकर्णी, सुनील पवार, वसंत कऱ्हाड, विष्णू मुसळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सरकारला जड जाईल; रविकांत तुपकराचा सरकारला पुन्हा इशारा

बुलढाणा : सध्या राज्यात विधानसभा निवडणूकांच्या रणधुमाळीला सुरूवात झाली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली असून राज्यभर दौरे केले जात आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप पहायला मिळत असतानाच शेतकरी नेते रविकांत तुपकर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून आक्रमक झाले आहेत. तुपकर यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारला इशारा दिला असून राज्यव्यापी आंदोलन उभारू असे म्हटले आहे.

राज्यातील सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेकऱ्यांच्या प्रश्नासह सोयाबीन आणि कापसाच्या दरवाढीवरून तुपकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. तर शेतकऱ्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय निवासस्थान असणाऱ्या वर्षावर धडक देऊन शेतकरी कशी आत्महत्या करतो. याचे प्रत्याक्षिक दाखवू असा इशारा दिला होता. त्यावरून बुलढाणा पोलिसांनी तुपकरांना नोटीस

बजावली होती. तर आंदोलनाच्या आधी त्यांनी तुपकरांना अटक करण्यात आली होती. तुपकर यांनी, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी आणि शेतकऱ्यांना पीक विमा देण्याची मागणी मुंबईच्या आंदोलनामध्ये याआधीच केली होती. तर गेल्या दोन ते तीन वर्ष पडलेल्या सोयाबीन आणि कापसाच्या दरावरून केंद्र सरकारशी चर्चा करून आयात आणि निर्यातीबाबत राज्य सरकारने धोरण ठरवावे, अशी मागणी केली होती. मात्र, राज्य सरकारने आमच्या मागणी आणि आंदोलन दडपले. मला आटक केली. पण आमच्या काही शेतकरी कार्यकर्त्यांनी गिरगाव चौपाटीवर आंदोलन असे तुपकरांनी म्हटले आहे. तर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसह सोयाबीन आणि कापसाच्या दराबाबत दोन ते चार दिवसांत निर्णय घ्या. अन्यथा येणाऱ्या काळात कर्जमुक्ती, पीक विमा, सोयाबीन आणि कापूस दरवाढीसह आदी शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन केलं जाईल. जे न भूतो न भविष्यति असे असेल. ज्यामुळे सत्ताधारी नेत्यांना राज्यात फिरणं देखील मुश्किल होईल. तर आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासह राज्यातील मुजोर सत्ताधारी सरकारला झुकवण्यासाठी शेतकऱ्यांनी पक्ष, जात, धर्म बाजूला ठेवून एकत्र यावे. जर आपण जाती-साठी एकत्र येत असू तर मग मातीसाठी देखील एकत्र आलं पाहिजे, अस आवाहन रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांना केलं आहे.

रेशीम शेती हे महिन्याला शाश्वत उत्पन्न देणारे पीक - बोराडे

हवामान बदलामुळे शेती धोक्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी नवीन पिकांचा शोध घेत आहेत. या बदलत्या हवामानात प्रत्येक महिन्याला शाश्वत उत्पन्न देणारे पीक म्हणून रेशीम शेती पुढे येत आहे, असे मत मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे सचिव विजयआण्णा बोराडे यांनी कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी, जालना येथे पाच दिवसीय रेशीम उद्योग प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले.

या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. एस. व्ही. सोनुने, जिल्हा रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, कृषी विज्ञान केंद्रातील किटकशास्त्रज्ञ अजय मिटकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री बोराडे म्हणाले, की महिलांमध्ये बारकाईने काम करण्याची वृत्ती व संगोपन कौशल्य असल्यामुळे महिला रेशीम शेती चांगल्या प्रकारे करू शकतात. रेशीम शेतीला शेततळ्याची जोड दिल्यास बाराही महिने रेशीम शेती करून शाश्वत उत्पन्न घेता येते.

गावामध्ये एकट्याने रेशीम शेती करण्याऐवजी गटातून केल्यास एकमेकाला गरजेनुसार पाला वापरता येतो. तुती हे पीक इतर पिकांच्या तुलनेत आरामदायी पीक आहे. शेतकऱ्यांनी रेशीम शेतीमध्ये प्रामाणिकपणे सातत्य ठेऊन काम केल्यास नोकरदाराप्रमाणे महिन्याला उत्पन्न काढता येते, अजय मोहिते यांनी रेशीम शेतीमधील संधी या संदर्भात मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकपर भाषण डॉ. सोनुने यांनी केले. पाच दिवसामध्ये तुती रोपवाटिका तयार करणे, तुती लागवड, रेशीम किटक संगोपन, कोष काढणी इत्यादी विषयावर प्रशिक्षणार्थ्यांना बौद्धिक व प्रात्यक्षिक सत्रांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षानार्थींची अभ्यास सहल आयोजित करून कचरेवाडी येथील रेशीम उद्योगास भेट, पैठण येथील रेशीम साडी तयार करण्याच्या प्रकल्पास व धागा निर्मिती केंद्रास भेट देण्यात आली. या प्रशिक्षणास जिल्ह्यातील १६ गावातून ३३ महिलांसह एकूण ५७ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सर्व यशस्वी प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन किटक शास्त्रज्ञ अजय मिटकरी यांनी केले.

योग्य चारा खाऊ घातल्यास शेळ्या देतात अधिक दूध

एकट्या गेल्या वर्षी आपल्या देशात सुमारे १०० लाख टन मांसाचे उत्पादन झाले. ही संख्या आणखी वाढू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. शेळी असो वा म्हशीचे मांस निर्यातीचे आकडे दुप्पट होऊ शकतात. मात्र गरज आहे ती जनावरांच्या आहारात बदल करण्याबरोबरच त्यांना रोगमुक्त ठेवण्याची.

शेळी तज्ज्ञांच्या मते, आजही देशात शेळीपालन हे दुधापेक्षा मांसासाठीच जास्त केले जाते. एकट्या गेल्या वर्षी मांसासाठी एक कोटीहून अधिक बकऱ्यांची कत्तल करण्यात आली होती. तात्काळ नफ्यामुळे देशात शेळीपालन झपाट्याने वाढत आहे. तज्ञ देखील त्यास फायदेशीर दृष्टिकोनातून पाहतात. परंतु, शेळीपालनादरम्यान बाजारातील मागणीनुसार शेळ्यांना हिरवा चारा खाऊ घालत असाल तर त्याचा नफा आणखी वाढू शकतो. कारण शेळीचे मांस निर्यात करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यामुळेच मांस निर्यातदार अशा शेळ्यांना जास्त भाव देत आहेत ज्यांना खास चारा दिला जातो. कारण सामान्य चारा खाल्ल्याने कीटकनाशक घटक मांसामध्ये येत आहेत आणि असे अनेक देश आहेत जे असे मांस खरेदी करत नाहीत. तर जगभरातील अनेक देशांमध्ये केवळ बकरीचे मांसच नाही तर म्हशीचे मांसही पसंत केले जाते.

सेंद्रिय चारा दिल्यास नफा वाढेल : चारा तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ डॉ.मोहम्मद आरिफ सांगतात की, मांस निर्यात करताना शेळीच्या मांसाची रासायनिक चाचणी केली जाते. हैदराबादची नॅशनल मीट रिसर्च इन्स्टिट्यूट ही तपासणी करते. अनेकवेळा असे घडले की मांसाची खेप तपासणीनंतर परत केली गेली. शेळ्यांना दिल्या जाणाऱ्या चाऱ्यात कुठेतरी कीटकनाशकाचा वापर केल्यामुळे असे घडते. पण आता देशात सेंद्रिय चाराही पिकवला जात आहे. शेळ्यांना सामान्य चारा देण्याऐवजी तुम्ही त्यांना विशेष सेंद्रिय चाराही देऊ शकता.

या जातीच्या शेळ्या मांसासाठी पाळा : शेळीपालन करणाऱ्या मोहम्मद रशीद यांनी शेतकऱ्याशी संवाद साधताना सांगितले की, परिसरात उपलब्ध असलेल्या शेळ्या-मेंढ्यांच्या जातीचे संगोपन करावे. कारण तीच जात चांगली वाढेल. परंतु विशेषतः मांसासाठी आवडणाऱ्या आणि पाळल्या जाणाऱ्या शेळ्यांच्या जातींमध्ये बारबरी, जमनापारी, जाखराणा, ब्लॅक बंगाल, सुजोत या प्रमुख जाती आहेत. त्यांचे संगोपन केल्याने दुप्पट उत्पन्न मिळते. कारण बारबारी, जमनापारी आणि जाखराणा जातीच्या शेळयाही भरपूर दूध देतात.

राजस्थानमधील १८ वर्षांच्या मुलाने तयार केले 'सौरऊर्जेवर चालणारे तणनाशक यंत्र'

गरज ही शोधाची जननी आहे असे आपण ऐकले आहे परंतु राजस्थानमधील १८ वर्षांचा तरुण रामधन लोढा याने ते सिद्ध करून दाखविले आहे. रामधन याने शेतीसाठी उपयुक्त आणि बहुउद्देशीय सौर ऊर्जेवर चालणारे तणनाशक यंत्र तयार केले आहे. शेतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता असलेल्या त्याच्या या यंत्रामुळे मजुरीवरील खर्च ५०% कमी तर होईलच शिवाय कार्यक्षमता ६० टक्क्यांनी वाढेल. रामधन याने तयार केलेले हे यंत्र कृषी क्षेत्रातील नवोपक्रमाच्या लाटेला प्रेरणा देणारी आहे. राजस्थानच्या झालावाड येथील रामधन याने वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी शेतीतील संघर्ष जवळून पाहिला होता. आपल्या पालकांना आणि इतर शेतकऱ्यांना थोड्या मोबदल्यासाठी शेतात काम करताना पाहून, रामधनला त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या अडचणी समजल्या. राजस्थानमधील एका शेतकरी कुटुंबात संगोपन झालेल्या रामधनने वडिलांना आणि गावातील इतर शेतकऱ्यांना शेतातील अनावश्यक आणि पिकांना हानिकारक अशा तणांशी लढताना पाहिले. या तणांमुळे पिकाचे उत्पादन लक्षणीयरीत्या कमी होते हे त्याने स्वतः अनुभवले. या सुरुवातीच्या अनुभवांनी त्याच्यामध्ये विज्ञान आणि नवकल्पनाचे बीज पेरले गेले. यातून लहान-शेतकऱ्यांचे ओझे हलके करण्याच्या उद्देशाने त्याने प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

विज्ञानाची आवड : लहानपणीही रामधनला विज्ञानाबद्दल स्वाभाविक कुतूहल होते. काहीतरी नवीन आणि फायदेशीर बनवण्याच्या इच्छेने प्रेरित होऊन मशिनशी छेडछाड करण्यात आणि प्रयोग करण्यात तासनतास घालवले. काहीतरी नवीन घडवण्याच्या मानसिकतेतून शाळेत होणाऱ्या प्रत्येक विज्ञान स्पर्धेत त्याने भाग घेण्यास सुरुवात केली. त्याचे सुरुवातीचे प्रयत्न लहान स्वरूपाचे असले तरी, ते एका मोठ्या ध्येयाकडे पाऊल टाकत होते. त्यांचे वडील राजाराम लोढा यांना पिकांना खत घालण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जड फवारणी पंपाशी झगडताना पाहून त्याला हे मिशन अधिकच निकडीचे बनले. त्याच्या वडिलांना सहन करावे लागणारे कष्ट, सततच्या वापरामुळे खांद्याला होणारी दुखापत आणि रसायनांच्या संपर्कात आल्यामुळे सततचे येणारे आजारपण हे सर्व रामधन बघत होता. अडचणीवर मात करून केला शोध : वडिलांना होणाऱ्या त्रासावर उपाय शोधण्याचा निर्धार करून, रामधन याने एक यंत्र तयार केले जे केवळ खतांची फवारणी करू शकत नाही तर तण देखील उपटून टाकू शकते, ज्यामुळे शेतकऱ्यांवरील शारीरिक ताण मोठ्या प्रमाणात कमी होतो. मात्र, निधी उपलब्ध करून घेण्याचे मोठे आव्हान त्याच्यासमोर होते. आपल्या आई-वडिलांवर आर्थिक भार पडू नये म्हणून तो त्याच्या प्रकल्पासाठी लागणारा पैसा गोळा करण्यासाठी विज्ञान स्पर्धांकडे वळला. सुमारे तीन वर्षांपूर्वी त्याने स्पर्धांमध्ये भाग घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या चिकाटीचे फळ त्याला मिळाले आणि आज त्यांनी सौरऊर्जेवर चालणारे, संकरित तणनाशक यंत्र यशस्वीरित्या विकसित केले आहे.

ओळख आणि बक्षिसे : रामधनचे समर्पण आणि सर्जनशीलता दुर्लक्षित राहिलेली नाही. अलीकडेच, त्याने स्केलर स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीने आयोजित केलेल्या इंडियन सिलिकॉन व्हॅली चॅलेंज या राष्ट्रीय स्पर्धेत बक्षीस रक्कम म्हणून १ लाख रुपये जिंकले. या पुरस्काराने त्यांच्यासाठी नवीन संधी खुल्या केल्या आहेत, त्याच्या या शोधामुळे त्याला भारताच्या बाहेरही ओळख मिळाली आहे. बाहेरच्या देशातून त्याला विचारणा होते असे तो अभिमानाने सांगतो.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८४५ : 'सायंटिफिक अमेरिकन' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९०४ : कलकत्ता ते बैरकपुर शहरादरम्यान पहिल्या कार रॅलीचे आयोजन करण्यात आलं होत.
१९१६ : पहिले महायुद्ध जर्मनीने रोमानियाविरुद्ध युद्ध पुकारले.
१९१६ : पहिले महायुद्ध इटालीने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९३१ : फ्रान्स आणि सोविएत युनियनने शस्त्रसंधी करार केला.
१९३७ : 'टोयोटा मोटर्स' ही स्वतंत्र कंपनी बनली. जपानची जपानी बहुराष्ट्रीय ऑटोमोटिव्ह निर्मिती कंपनी 'टोयोटा मोटर्स' ची स्थापना करण्यात आली.
१९८६ : भाग्यश्री साठे बुद्धिबळ ग्रँडमॅस्टर बनणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.
१९९० : इराकने कुवेत हा आपलाच एक प्रांत असल्याचे जाहीर केले.
१९९२ : श्रीलंकन क्रिकेटपटू व फिरकी गोलंदाज मुथया मुरलीधरन यांनी ऑस्ट्रेलिया विरुद्ध कसोटी सामन्यात पदार्पण केले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४९ : योहान वूल्फगाँग गटें जर्मन महाकवी, लेखक, कलाकार आणि राजकारणी (मृत्यू: २२ मार्च १८३२)
१८९६ : रघुपती सहाय ऊर्फ फिराक गोरखपुरी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू शायर ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (मृत्यू: ३ मार्च १९८२)
१९०६ : नटवर्य चिंतामणी गोविंद तथा 'मामा' पेंडसे (मृत्यू: १९९१)
१९०८ : विनायक माधव तथा 'विमादी' पटवर्धन दीक्षित विनोदकार (मृत्यू:)
१९१३ : भोपाल रियासतेच्या राजकुमारी व भारतातील पहिल्या महिला वैमानिक आबिदा सुल्तान यांचा जन्मदिन.
१९१८ : राम कदम मराठी चित्रपट प्रसिद्ध संगीतकार (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९९७)
१९२६ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित माजी पोलिस सेवा अधिकारी, गुप्तचर विभाग प्रमुख तसचं, सिक्किम, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश राज्याचे माजी राज्यपाल टी. व्ही. राजेश्वर यांचा जन्मदिन.
१९२८ : उस्ताद विलायत खाँ सुप्रसिद्ध सतारवादक (मृत्यू: १३ मार्च २००४)
१९२८ : भारतीय पदार्थवैज्ञानिक एम. जी. के. मेनन यांचा जन्म.
१९२९ : प्रख्यात भारतीय हिंदी भाषिक लेखक, कथाकार, उपन्यासकार आणि आलोचक राजेंद्र यादव यांचा जन्मदिन.
१९३४ : सुजाता मनोहर सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षा
१९३८ : कॅनडाचे पंतप्रधान पॉल मार्टिन यांचा जन्म.
१९५४ : भारतीय-इंग्लिश अर्थशास्त्री रवी कंबुर यांचा जन्म.
१९६५ : पोकेमोन चे निर्माते सातोशी ताजीरी यांचा जन्म.
१९६६ : प्रिया दत्त लोकसभा खासदार?

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६७ : मिर्झा राजे जयसिंग (जन्म: १५ जुलै १६११) जयपूर चे राजे
१९६९ : भारतीय स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत रावसाहेब पटवर्धन यांचे निधन.
१९७२ : भारतीय नागरी सेवक आणि प्रशासक तसचं, भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे सदस्य एन. माधवराव यांचे निधन.
१९८० : लोकप्रिय बंगाली लेखक, विनोदी व लघुकथाकार व क्रांतिकारक शिब्राम चक्रवर्ती यांचे निधन.
१९८४ : इजिप्तचे पहिले राष्ट्रपती मुहम्मद नागुब यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९०१)
१९९० : भारतीय चित्रपट अभिनेत्री सुमित्रा देवी यांचे निधन.
२००१ : व्यंकटेश दिगंबर माडगूळकर लेखक, चित्रकार, पटकथाकार, शिकारी (जन्म: ६ जुलै १९२७)

उसावरील व्हिनेगर आजार रोखण्याचे उपाय

देशातील बहुतांश शेतकऱ्यांना उसावर होणाऱ्या रोगांची ओळख पटत नाही, त्यामुळे पिकाच्या उत्पादनात मोठी घट होत आहे. ऊसावर परिणाम करणारा असाच एक रोग म्हणजे रेड रॉट रोग, ज्यामुळे उसाला व्हिनेगरसारखा वास येतो. या आजारापासून मुक्त होण्यासाठी काही उपाय आहेत.

लाल रॉट रोगाची लक्षणे :उसाच्या मुळापासून वरच्या भागापर्यंत रेड रॉट रोग होतो. रोगामुळे उसाची पाने पिवळी पडतात व त्यावर लाल ठिपके पडतात ही त्याची ओळख आहे. अशा स्थितीत प्रादुर्भाव झालेला ऊस अर्धा कापून फाडून टाकल्यास, उसाचा लगदा लाल रंगाचा दिसू लागल्यास व व्हिनेगरसारखा वास येत असल्यास शेतात प्रादुर्भाव झाल्याचे समजते. रेड रॉट रोग हा बुरशीजन्य रोग असून, त्याचा प्रादुर्भाव उसाच्या खोडावर होतो. या रोगामुळे उसाचे उत्पादन व गुणवत्ता कमी होते. त्याचबरोबर या आजाराला 'ऊस कॅन्सर' असेही म्हणतात. ऊस पिकाचे लाल कुंड रोगापासून संरक्षण करण्यासाठी शेती करताना निरोगी व प्रमाणित बियाणे वापरावे. त्याच शेतात उसाची वारंवार पेरणी केल्याने लाल कुंड रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे पीक चक्रात भात, जवस, मोहरी, कांदा, लसूण, हिरवळीचे खत ही पिके घ्यावीत. रोगट झाडे उपटून नष्ट करावीत. त्यानंतर तेथे ५ ते १० ग्रॅम ब्लिचिंग पावडर टाकून मातीने झाकून टाकावे. यामुळे जमिनीत उरलेले बीजाणू मरतात. हे काम ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात करावे. असे केल्याने रोगाचा विकास मोठ्या प्रमाणात कमी होतो. रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रादुर्भावग्रस्त झाडे शेतातून काढून टाकावीत आणि शेतात कार्बेन्डाझिम किंवा मॅन्कोझेबची फवारणी करावी.

रोग टाळण्यासाठी इतर उपाय : उसामध्ये रेड रॉट रोग आढळल्यास उसाचे लहान तुकडे करावेत. जर तुकड्यांचे टोक लाल असतील तर ते वेगळे काढा. याशिवाय रोग प्रतिरोधक वाणांचा वापर करावा. त्याचबरोबर शेतात पाण्याचा निचरा होण्याची योग्य व्यवस्था करावी. ज्या शेतात पूर येतो त्या शेतात माती उपसून उसाची पेरणी केल्यास लाल कुजण्याचा रोग होण्याची शक्यता कमी असते. तसेच झाडांमध्ये सुरुवातीची लक्षणे २ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास ब्लीचिंग पावडर १० किलो प्रति एकर या प्रमाणात माती किंवा वाळूमध्ये मिसळून शेतात टाकावी. त्यानंतर हलके सिंचन करावे.

मुस्लिम बहुल प्रभागातील नागरिक नरक यातना भोगताहेत -ॲड. शेख शफीक

बीड । प्रतिनिधी

शहरातील अनेक मुस्लिम बहुल भागात क्षीरसागर यांच्या मेहरबानीने तसेच बीड नगर परिषदेच्या दुर्लक्षपणामुळे येथे राहणारे नागरिक अक्षरशः नरक यातना भोगत आहेत परंतु याचे कुठलेही सोयरसुतक कोणत्याही क्षीरसागराला नाही. शिवाय बीड नगर परिषदेला ही नाही. यामुळे पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील ईदगाहनगर, तेलगाव नाका भागातील नागरिकांच्या विविध समस्या (रस्ते, नाल्या,पाणी,लाईट) विषयी पक्षाचे वार्ड १९ चे अध्यक्ष शेख नेहाल आणि शेख सलीम अमीर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड नगर परिषद समोर आमरण उपोषण करण्यात आले होते. यावेळी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून तसेच संबंधित अधिकारी सम्राट कदम, इंजिनीयर अखिल फारोकी, विश्वंभर तिडके यांच्या लिखित दिलेल्या पत्रानंतर आमरण उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी लोक पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते भागवत तावरे यांनी उपोषणाला पाठिंबा दिला.

या आंदोलनात संबोधित करताना पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी क्षीरसागरांनी शहराचे वाटोळे केले, त्यात बीड नगर परिषद सुद्धा मागे राहिली नाही. म्हणून मुस्लिम बहुल प्रभागातील नागरिक नरक यातना भोगत आहेत असे म्हणत कडाडले. भाऊंचा हा रूद्रावतार बघून नगर परिषद परिसरात सर्वचजण अवाक झाले होते. पुढे बोलताना भाऊ म्हणाले, गेल्या ३०-३५ वर्षांपासून क्षीरसागर घराण्याचे बीड नगर परिषदेवर एकाधिकार शाही प्रमाणे राज्य होते. अपवाद फक्त गेल्या तीन वर्षांपासून प्रशासक राज आल्याने क्षीरसागरांपासून बीड नगर परिषदेला मुक्ती मिळाली. असे असले तरी प्रशासक राज मध्ये बीड नगर परिषदेला भेटलेले प्रशासक आणि मुख्याधिकारी यांनीही हवे त्या प्रमाणात शहराकडे लक्ष न दिल्याने आज शहराची बकाल अवस्था झालेली आहे. अपवाद वगळता शहरातील अनेक लहान मोठ्या रस्त्यांवर जागोजागी कचऱ्याचे ढिगारे साचलेले आहेत. नाल्या तुटलेल्या आहेत. रस्ते झाडले जात नाहीत. नळाला पाणी दहा ते पंधरा दिवसात सोडले जाते. तेही कधी गढूळ, कधी अळ्या युक्त तर कधी दुर्गंधीयुक्त. ही सर्व बकाल अवस्था तीस वर्षांपासून क्षीरसागरांच्या घराण्यामुळे झालेली आहे. तर गेल्या तीन वर्षांपासून प्रशासक आणि मुख्याधिकारी यांनीही क्षीरसागरांचीचरी ओढली आहे. म्हणून या सर्वांनी मिळून बीड शहराचे वाटोळे करून टाकले आहे.

त्यातही मुस्लिम बहुल प्रभागातील अत्यंत दयनीय व शोचणीय अवस्था पाहता येथील नागरिक अक्षरशः नरक यातना भोगून जगत असल्याचे विदारक चित्र शहरात दिसून येत आहे असे प्रतिपादनही शफिक भाऊंनी केले. यावेळी पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष तथा जिल्हा उपाध्यक्ष शेख एजाज (खन्ना भैय्या), युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, तालुका उपाध्यक्ष साजन चौधरी,अय्युब भाई अमीर साहेब, बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद, सामाजिक कार्यकर्ते सादेख पठाण, समीर भाई, अरशद् किंग, हाजी एजाज, खमर, शेख चाँद, सादेख, नसीर, मुस्तफा, अब्बास, रईस, बासेद, अनिस, समीर, तुराब, दिलावर,अमर, मुन्ना, दस्तगीर, जावेद खान, आदींसह मोठ्या संख्येने भागातील नागरिक उपस्थित होते.

वडवणीत पोलीसांच्या कारवाईच्या भितीने पानटपऱ्या बंद

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरात दिल्या आठ दिवसापासून पोलीस व अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने गुटखा पान मसाला विक्री करणाऱ्या पान टपरी धारकांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू केलेल्या असल्यामुळे शहरातील चौका चौकातील गुटखा विक्री करणाऱ्या पान टपरीधारकांमध्ये खळबळ उडाली असून पान टपरी बंद ठेवण्याची वेळ आलेली आहे.

राज्य शासनाने राज्यात गुटखा, सुगंधी पानमसाला, तंबाखू जन्य पदार्थ तयार करणे व विक्री करण्यास बंदी घालण्यात आलेली असुन वडवणी शहरासह तालुक्यात हि गुटखा विक्री करणाऱ्यावर पोलिस व अन्न औषध प्रशासनाने कारवाई करण्याची मोहीम सुरू केलेली असुन गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे त्यामुळे हि मोहीम राबविण्यात येत असुन यामध्ये वडवणी शहरासह तालुक्यातील गुटखा विक्री करणाऱ्या छोट्या छोट्या पान टपरी धारकांवर पोलिसांनी कारवाई करण्याची मोहीम सुरू केलेली असल्यामुळे गेल्या आठ दिवसांपासून शहरासह तालुक्यातील पानटपरी दुकाने बंद असुन पोलीसांच्या कारवाईच्या मोहिमेने पान टपरी धारकामध्ये खळबळ उडाली असून पान टपर्या बंद असल्याचे दिसून येत आहे.

पोलीस अधीक्षक साहेब यांच्या आदेशानुसार गुटखा तस्करी, गुटखा विक्री करणाऱ्यावर वडवणी तालुक्यात कारवाई करण्याची मोहीम सुरू असुन यामध्ये कोणीही गुटखा विक्री करत असेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल :- सपोनि अमन सिरसट.

वडवणी हे तालुक्याचे ठिकाण असुन या ठिकाणी पान टपरी धारकांना अवैध गुटखा, सुगंधी पानमसाला, तंबाखूजन्य पदार्थ कोणते गुटखा तस्कर हे कोठून आणुन पुरवठा करतात याचा पण पोलिसांनी शोध लावुन कारवाई करण्याची आवश्यकता असुन गोर गरिब टपरी चालकांसह गुटखा तस्करी करणाऱ्यांवर हि कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत आहे.

थोडक्यात

देव एकच आहे वेगवेगळा नाही-मेंगडे महाराज

चौसाळा : दुष्टाचा सौहार करण्यासाठी देवाने वेगवेगळे अवतार धारण केले आहे त्यातूनच देवाने दुष्टाचा सौहार केला आहे असे प्रतिपादन बंकट स्वामी मठादीपती लक्षुमन महाराज यांनी केले चौसाळा येथे ग्रामस्थ्यांच्या वतीने येथील हनुमान मंदिरात शिवपुराण पारायण तथा दैनंदिनी कीर्तनचे आयोजन केले होते सदर साप्ताहच्या सांगता निम्मिताने कीर्तनाचे व शिरीकृष्णा जन्माष्टमी सोहळा या कल्याच्या कीर्तनातून ह भ प मेंगडे महाराज यांनी श्री कृष्ण जन्म त्यांचे बालपण राधा कृष्ण व कौनसाचा नाश यांच्यावर कीर्तन केले सदर साप्ताहत हभप महेश महाराज निनाळे यांच्या सह इतर मान्यवराचे कीर्तन तसेच दिनांक २४/८/२४ रोजी परम पूज्य कुसुम कैवर्जी मासा व परम पूज्य अरुण प्रभाजी मासा यांचे प्रवचन झाले या प्रवचनाने श्रोत्यांना मंत्र मुग्ध केले या साप्ताहच्या कार्यक्रमात सर्व श्री महेश महाराज निनाळे चंद्रसेन गुंजाळ सुभाष पारवे महादेव (बाप्पा) नायकवाडे शंकर मिटकरी उद्धव जाधव (हिंगणी) अनंत देशमुख अमोल कळसकर बाळासाहेब नाईकवाडे रमेश निनाळे राम कृष्ण चौधरी (आण्णा) यांच्या सह इतर इतर नागरिकांनी सहभाग घेतला

पाटोदा बेलखंडी विद्यालयात दहीहंडी

बीड : तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीडचे पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा बेलखंडी येथे वार्षिक नियमाप्रमाणे दहीहंडी उत्सव मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य धनवंत मस्के यांचे मार्गदर्शन घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी कृष्णाच्या गीतावर ठेका धरला व सर्वांनी संयुक्त सांस्कृतिक नृत्य करून मोठ्या उत्साहात मुलांनी स्वतंत्र दहीहंडी फोडली व मुलींसाठी स्वतंत्र दहीहंडीचे नियोजन करण्यात आले सर्व भेदभाव विसरून सर्व विद्यार्थी एका मनाने या कार्यक्रमांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. त्यामुळे हा अनोखा दहीहंडी उत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये विद्यालयाचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते हा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर सर्वांना दहीहंडीच्या काल्याचा महाप्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

जीवाचीवाडी येथे सप्ताहची सांगता

येवता : केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहची सांगता ह.भ.प.बालयोगी श्री.हरिहर महाराज दिवेगावकर यांचे अमृत्यूल काल्याचे किर्तन सकाळी ११ते ०१वा. संपन्न झाले. किर्तनरूपी सेवेसाठी महाराजांनी आता हेची जेव सवे घेऊ शिदोरी हरिनामाचा प्रेमेमोहीला साधने तुका म्हणे गोड लागे, महाराजांनी श्रीकृष्णाच्या विविध खोड्या व द्रष्टांत दिले, किर्तनास गायक, विनेकरी टाळेकरी,मृदांगाचार्य भावीक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. आयोजक: युवानेते रामा अनंता चौरे व समस्त ग्रामस्थ मंडळी जीवाचीवाडी.

भव्य दहिहंडी महोत्सवाचा लाभ घ्या-संजय आजबे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात जयदत्त सुरेश धस मित्र मंडळाच्यावतीने अतिशय भव्यदिव्य दहीहंडी आष्टी महोत्सव २०२४ आज बुधवार दि.२८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता साजरा केला जाणार आहे. या भव्य दहीहंडी महोत्सवाचा मतदारसंघासह जिल्ह्यातील प्रेमींनी लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा उपाध्यक्ष संजय आजबे यांनी केले आहे.

आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात युवा नेते जयदत्त धस मित्र परिवार आष्टी, पाटोदा, शिरुर यांच्यावतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी माजी मंत्री सुरेश धस यांच्यासह मराठी चित्रपट सृष्टितील प्रसिद्ध अभिनेत्री मानसी नाईक, सिने अभिनेत्री सई मांजरेकर, झेबा शेख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या महोत्सवामध्ये डीजेच्या तालावर तरुणाई धीरकणार असून प्रसिद्ध सुत्रसंचालिका निशा कुसेकर या सूत्रसंचालन करणार असून या महोत्सवाची जोरदार तयारी झाली आहे. मतदारसंघासह जिल्ह्यातील प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित दर्शवून लाभ घ्यावा आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष संजय आजबे यांनी केले आहे.

संस्कार भारतीच्या वतीने दहीहंडी उत्साहात

माजलगाव। प्रतिनिधी

श्रीकृष्ण जन्माष्टमी चे औचित्य साधून येथील सक्सेस स्कूल आणि संस्कार भारतीं माजलगावच्या वतीने कृष्णरूप सज्जा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यावेळी प्रमुख अथितीं म्हणून प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ.सावित्री घाटूळ उपस्थित होत्या. यावेळी कृष्ण जन्मावरील सुंदर नाटिका बाल कलाकारांनी सादर केली तर कृष्ण जीवनातील विविध प्रसंग गोपिका नृत्य, रास क्रीडा नृत्य, राधा हि बावरी असे सुंदर नृत्य अविष्कार सादर करण्यात आले.

बाल कलाकारांनी सादर केलेल्या कृष्ण चरित्रातील विविध प्रसंगातून शाळेच्या आवारात अक्षरशः गोकुळच अवतरले होते. यावेळी प्रमुख अथिती डॉ.सावित्री घाटूळ यांनी संस्कार भारतीं आणि शाळेच्या संयुक्त उपक्रमाचे कौतुक केले आणि बाल कलाकारांना शुभेच्छा दिल्या. संस्कार भारतीच्या सचिव सौ.गौरी देशमुख यांनी संस्कार भारतीच्या उपक्रमाची माहिती दिली आणि सर्वांचे आभार मानले. कृष्णरूप आणि राधारूप अशा ३५ स्पर्धकांनी भाग घेतला.मोठ्या गटात शिवानी बादाडे हिस प्रथम तर ऋत्विक सोळंके यास द्वितीय क्रमांक मिळाला तर बाल गटात शमिका आनंदगावकर हिस प्रथम अर्जुन शेंडगे यास द्वितीय तर गौरी पांडे हिस तृतीय क्रमांक मिळाला मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा सचिव सुरेश भानप, अध्यक्ष स्मिता लिंबगावकर,सचिव गौरी देशमुख, सक्सेसचे संचालक आणि संस्कार भारतीचे बाल आयाम प्रमुख निरंजन वाघमारे, कोषप्रमुख दिगंबर महाजन,सुरेखा गवळी,वृषाली तालखेडकर, प्रिन्सिपॉल शिंगाडे यांच्या सह पालक वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.यानंतर विद्यार्थ्यांनी उत्साहात दहीहंडी फोडली आणि कार्यक्रमाची सांगता झाली

ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बिन्हाड मोर्चा

१०० रमाई घरकुलाचे प्रलंबित पहिला हप्ता तात्काळ द्या- नितीन सोनवणे

पाटोदा। प्रतिनिधी

दोन महिन्यांपासून यादी लागलेली असून मंजूर झालेल्या शंभर रमाई घरकुलाचे पाटोदा येथील चेक देण्यात यावेत भर पावसात दलितांचे घरे उघड्यावर आहेत चेकला उशीर झाला म्हणून दलित समाजात संताप आहे मानसिक तणावात आहेत आजही स्वतंत्र भारतात आमची व्यवस्था बिकट आहे मंजूर चेक वाटप न करणे हा जातीवाद आहे ऑल इंडिया पँथर सेना मागणी करत आहे येणाऱ्या चार दिवसात चेक वाटप न झाल्यास शिवाजी चौक ते नगर पंचायत पाटोदा दलितांचा बिराड मोर्चा काढण्यात येईल असा इशारा दिला आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय दीपक भाई केदार करतील राज्याचा मुद्दा केल्याशिवाय शांत बसणार नाही उघड्यावर कुटुंब राहत आहेत पावसात त्यांच्या जिवितास काही झाल्यास नगरपंचायत जबाबदार राहील याची नोंद घ्यावी अशा आशयाचे निवेदन आज मुख्याधिकारी नगरपंचायत पाटोदा यांना ऑल इंडिया पँथर सेना च्या वतीने देण्यात आले, नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष, बापू जावळे तालुका अध्यक्ष, ऋषिकेश जावळे, आशिष जावळे, नितीन जावळे, सुरज जावळे, गोटू जावळे, प्रतीक जावळे, संकेत जावळे, व पाटोदा तालुक्यातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.!

वृक्षारोपण व सिमेंट रोडच्या कामाची सुरूवात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांचे खंदे समर्थक व युवा उद्योजक महेश गायके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन गावात वृक्षारोपण व वॉर्ड क्र.३ मधील चोपणे गल्ली मध्ये नवीन सिमेंट रोडच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

युवा उद्योजक महेश गायके यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गावात विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी दर्ग्या जवळ रोडलगत वृक्षारोपण करण्यात आले तसेच वार्ड क्र.३ मधील चोपणे गल्ली येथील नवीन सिमेंट रोडच्या कामाची सुरूवात उद्योजक महेश गायके व पं.स.सदस्य उमाकांत भुसारी यांच्या हस्ते कुदळ मारू सुरूवात करण्यात आली.यावेळी उपसरपंच महेश लामतुरे,चेअरमन अरूण चोपणे,अशोक मोडवे,सुरेश चोपणे,मन्मथ पाटील,चंद्रकांत भुसारी,अशोक चोपणे,संजय लांडगे,दादा निकम,रूपेश बोरगावकर,अरूण राऊत,महादेव मोडवे,बापु साखरे,बाळु राऊत,रमेश निशिगंध,शिवराज थळकरी,चंद्रकांत थळकरी,बबन लामतुरे,सुमेध उजगरे,दत्ता बाबर,राजु गायके,पत्रकार सचिन उजगरे व ग्रामस्थ उपस्थित होते.

भ्रष्ट सरकारला महाराष्ट्रातील जनता पायदळी तुडवेल - गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी

मालवण जिल्हा सिंधुदुर्ग येथे दि. ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठा गाजावाजा करत उद्घाटन करण्यात आलेला व कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळण्याची अत्यंत दुर्दैवी व खेदजनक घटना या शिवरायांच्या महाराष्ट्रात घडली.

आजही शिवकालीन किल्ले अनेक वास्तु शेकडो वर्षापासुन ताठ उभी राहुन मराठ्यांच्या इतिहासाची साक्ष देत असताना आठ महिन्यात उभारलेला शिवरायांचा पुतळा कोसळतो कसा? याला जबाबदार कोण? याचा अर्थ काय? हा प्रश्न शिवप्रेमींना पडलेला असुन यासरकारणे पुतळ्याचे नव्हे तर शिवरायांच्या विचाराला तडा देण्याचे काम केले असुन हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान शिवप्रेमी म्हणुन आम्ही कदापि सहन करणार नाहीत. महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या कामातही भ्रष्टाचार होतो कसा? यासर्व प्रकरणास राज्यातील शिंदे फडणवीस पवार सरकार जबाबदार असुन महाराष्ट्रातील शिवप्रेमी जनता या भ्रष्ट सरकारला पायदळी तुडवल्याशिवाय शांत बसणार नाही असे शिवक्रांती संघटनेचे अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील म्हणाले. आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गणेश बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात निषेध व्यक्त करत जिल्हाधिकारी बीड यांना शिवक्रांती युवा परिषद व बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन देण्यात आले. या निवेदनावर तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, युवक तालुकाध्यक्ष हनुमान घोडके, इंटकचे जिल्हाध्यक्ष रमधन जमाले, परमेश्वर घोडके, सखाराम बेंडगे, अशोक जाधव आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

बीड: जिल्ह्याचे नुतन पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी पदभार स्वीकारला असता त्यांची सदिच्छा भेट घेऊन सत्कार करताना युवा सेना राज्य कार्यकारिणी सदस्य विपुल पिंगळे

अखंड हरीनाम सप्ताहातून अध्यात्माची गोडी वाढते-राजेंद्र मस्के

सोमनाथवाडी येथे २५ वा अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी. या भूमीला संत परंपरेच अनुष्ठान लाभले.संत परंपरेमुळे महाराष्ट्रासह देशभरात भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार झाला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव अशा विविध संतांनी संस्कार आणि नीतीचे शिक्षण दिले. अखंड हरीनाम सप्ताहातून सतसंग लाभतो, नामस्मरणाची आवड निर्माण होते. खऱ्या अर्थाने अध्यात्माची गोडी वाढते.सुसंकृत समाज व्यवस्थेसाठी अखंड हरिनामाची गरज आहे. असे विचार भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सोमनाथवाडी येथील २५ व्या अखंड हरीनाम सप्ताह सांगता प्रसंगी व्यक्त केले.

आज बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे सोमनाथवाडी येथे २५ वा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प.अर्जुन महाराज शिंदे यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के याप्रसंगी उपस्थित राहुन महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेत, उपस्थित भाविक भक्तांना संबोधित करून नाम सप्ताहाचा लाभ घेतला. यावेळी समवेत बेलेश्वर संस्थांचे मठाधिपती महंत श्री महादेव महाराज भारती, सरपंच किशोर शेळके, श्री उद्धव जाधव, श्री सचिन मस्के यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संखेने उपस्थित होते. वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे. यामध्ये सात दिवस विविध प्रकारचे संत वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या हरिभक्त परायण महाराजांकडून संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकाराम पर्यंत विविध संतांच्या रचना असलेल्या अभंगावर तत्वचिंतन मांडण्यात येते. ज्याद्वारे मनुष्य जन्मात ईश्वर नामाचे विशद केले जाते.

गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे -जिल्हाधिकारी अविनाश पाठक

बीड । प्रतिनिधी

शांततापूर्वक आणि संयमी पणाने आपण येणाऱ्या काळातील गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज येथे केले.जिल्हयातील गणेशोत्सवासह येणाऱ्या काळातील सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आज नियोजन समितीच्या सभागृहात झाली, यावेळी ते बोलत होते.

उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

जिल्ह्यातील शांतता समितीच्या या बैठकीला पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, अपर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, पोलिस उपविभाग माजलगाव डी. बी. धिरजकुमार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील नगरपालिकांचे मुख्य अधिकारी तसेच प्रशासकही यावेळी बैठकीत उपस्थित होते. शहरात उत्सव चांगल्या पद्धतीने पार पाडावा यासाठी बीडमधील नगर रोडवरील एक बाजू येत्या आठ दिवसात सुरू केली जाईल. व दुसऱ्या बाजुचे खड्डे बुजविले जातील आणि पुढील काम उत्सवानंतर केले जाईल असे त्यांनी सांगितले. मिरवणूक मार्गावर असणाऱ्या विजेच्या तारांपासून सुरक्षा असावी या दृष्टीकोणातून कामे करावीत असे निर्देश त्यांनी वीज मंडळास यावेळी दिले. मंडळांनी शांततेत उत्सव पार पडावा यासाठी सहकार्य करावे, असे ते म्हणाले.

अनधिकृत होर्डिंग /ध्वनी प्रदूषणबाबत

बीड शहरातील तसेच इतर भागातील सर्व अनधिकृत होर्डिंग येत्या चार दिवसात हटविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री पाठक यांनी दिले. जिल्ह्यातील मोठ्या गावांमध्ये ग्रामपंचायतींनी होर्डिंग हटवावेत असेही ते म्हणाले. तंत्रज्ञान प्रगत झाले आहे त्यामुळे डिजिटल पुरावे कोणीही गोळा करू शकते या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषण होणार नाही याची खबरदारी मंडळांनी घ्यावी तसे झाले नाही तर थेट गुन्हे दाखल होतील, असेही गणेश मंडळाच्या अध्यक्षांना त्यांनी सांगितले. सोबतच मंडळांनी स्वतंत्र वीज मीटर घ्यावे. त्यासाठी एका दिवसात मीटर देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, असे सांगून जिल्हाधिकारी म्हणाले की, कुणासही काही अडचण असल्यास त्यांनी व्हाट्सपच्या ८७८८९९८४९९ या क्रमांकावर लेखी किंवा छायाचित्रांद्वारे कळवावे. यावेळी ग्रामीण भागात तालुका पातळीवर मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेतली जाईल तसेच राज्य शासनाच्या गणेशोत्सव स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले. पोलीस अधीक्षक यांनी कायदा सुव्यवस्था राखण्याचे आवाहन यावेळी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

सांगवी पाटण येथे दहीहंडी उत्सव साजरा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी(पा) येथे दहीहंडी उत्सव मोठ्या आनंदात संपन्न झाला. यावेळी शाळेतील विद्यार्थी कान्हा व राधा यांच्या वेशभूषेत होते. सामजिक कार्यकर्ते समीर शेख यांचे पुतणे अर्शान शेख कान्हाच्या वेशभूषेत तर नात अलीशा शेख व सिमरन शेख राधा च्या वेशभूषेत दिसत आहेत.. वैष्णवी भोसले , गणेश खिलारे, स्वानंदी खिलारे, अनुष्का खिलारे, ज्ञानेश्वरी भोसले, तनुष्का भगत, स्नेहल खंडागळे, स्नेहल जगताप, श्लोक जगताप, राजवीर भोसले, स्वरा खिलारे, सृष्टी राऊत, श्रेया खंडागळे, आरोही दाणी, शुभांगी खंडागळे ही सर्व चिमुकली मंडळी कान्हा व राधाच्या वेशभूषेत दिसत होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी दहीहंडी कार्यक्रमाचा आनंद घेतला.या आनंदोत्सवात सरपंच दत्तात्रय खोटे, पत्रकार संदिप जाधव मुख्याध्यापक तरटे सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भूषण खिलारे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सद्दाम शेख, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य विजय खिलारे, अशोक उढाणे सर, राहुल मुटकुळे सर, साखरे सर, जाधव मॅडम, खकाळ मॅडम, पालवे मॅडम सामाजिक कार्यकर्ते समीर शेखसह मोठ्या संख्येने पालकांची उपस्थिती होती.

गुरुवारी जनसन्मान यात्रेचा आष्टीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मेळावा

मतदारसंघातील शेतकरी व महिला वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित रहा -आ.बाळासाहेब आजबे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या जन सन्मान यात्रेचे गुरुवारी २९ रोजी दुपारी ३वाजता आष्टी शहरात जंगी स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर मोरेश्वर मंगल कार्यालयात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे .या मेळाव्याला आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी महिला युवक युतीने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केले. आष्टी येथील बाळासाहेब आजबे संपर्क कार्यालयात दिनांक २७ रोजी ११ आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषद बोलत होते. यावेळी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटा तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे यांच्या सह आधी उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की लाडकी बहीण योजनेचे खेड्यातील गोरगरीब कुटुंबीयांना या योजनेचा आधार मिळाला आहे. ही योजना कायमस्वरूपी टिकणारी असल्याचे आजबे यांनी सांगितले तसेच या मेळाव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल हे मार्गदर्शन करणार आहेत. पुढे बोलताना आजबे म्हणाले की अजितदादा यांच्या माध्यमातून आष्टी मतदार संघासाठी विविध विकास कामांकरिता जवळपास ३हजार कोटीचा निधी आपल्याला त्यांनी उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये जलसिंचनाचे काम मोठे प्रमाणावर झाले असून खुंटेफळ साठवण तलावाच्या शिंपुरा पाईप लाईन जलसिंचन योजनेसाठी अजित दादांनी तसेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस त्यांनी देखील मोलाचे सहकार्य केले आहे .येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती चा आष्टी मतदार संघाचा मतदारसंघाचा मीच उमेदवार असून मतदारसंघांमध्ये आपण फार मोठ्या प्रमाणावर विकास निधी आणून दर्जेदार कामे केले आहेत. तसेच आपण मंजूर झालेल्या कामांचा नारळ न फोडता ज्यावेळी कामाला प्रत्यक्षरीत्या कार्यारंभ आदेश वर्क ऑर्डर निघेल त्यावेळेसच त्या कामाचे आपण नारळ फोडलेले आहेत. आष्टी शहरामध्ये देखील मी मोठ्या प्रमाणावर नगरपंचाय हद्दीत जवळपास १० कोटी चा निधी आणला असून मात्र विरोधकाकडून या कामासाठी कागदोपत्री अडचणी आणल्या जातात हे त्यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले .आपल्यावर होत असलेल्या टीकेचा व्याजासहित उत्तर आपण येणाऱ्या काळात देणार आहोत असेही ते म्हणाले व आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकरी,महिला, युवती मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले.

शाळेच्या बससाठी अंबड आगारात ठिय्या

बस सुरु न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन

अंबड । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील डहाळेगाव येथील शेकडो मुला-मुलींची बस अभावी गैरोसाय होत असताना महामंडळाची बस येत नसल्याने सोमवारी संतप्त पालक व विद्यार्थ्यांनी अंबड येथील एसटी आगारात ठ्ठीय्या आंदोलन केले.

डहाळेगाव येथे पाचवी पर्यंत शाळेची व्यवस्था आहे. पुढील शिक्षणासाठी मुला-मुलींना घनसावंगी शहरात जावे लागते. परंतु शहरात जाण्यासाठी बस नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होते. बस सुरु करण्यासाठी गावकरी व पालकांनी अनेकदा आगार प्रमुख तसेच विभागीय नियंत्रक यांना निवेदन दिले. त्यानंतर बसच्या मार्गाच्या पाहणी देखील झाली आहे. डहाळेगावला जोडणारा रस्ता डांबरीकरणाचा आहे , परंतु केवळ गावाजवळ असलेल्या एका खराब पुलाचे कारण देऊन बस सुरु करण्यात आली नाही. गावकऱ्यांनी बसची ही अडचण समजून घेऊन मुरूम टाकून बस वळविण्याची व्यवस्था केली आहे. परंतु त्यानंतरही बस येत नसल्याने जवळपास १०० मुला - मुलांचे हाल सुरूच आहे. त्यामुळे संतप्त पालक व विद्यार्थ्यांनी

सोमवारी अंबड येथील एसटी आगारात आंदोलन करत संबधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. त्यावर आगार प्रमुखानी वरिष्ठ कार्यालयाचे पत्र आणण्याचे सांगून आंदोलकांना पुन्हा परत पाठवले.या आंदोलनात सरपंच राधाकिसन आव्हाड, नंदू मुके, भाऊराव मुके माजी सरपंच,भागवत काळे, रामेश्वर जाधव, महादेव जाधव, हनुमंत जाधव, मच्छिंद्र मुके, बाबासाहेब सदाव्रते यांच्यासह गावातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

बस अभावी मुलांचे शिक्षण थांबता कामा नये, एसटी महामंडळाला पुलाची अडचण असल्यास तात्पुरती दुरुस्ती मी तातडीने करायला तयार आहे. आगार प्रमुखांनी तातडीने वाहतूक नियंत्रकांना ही बाब सांगून बस सेवा सुरु करावी.
सतीश घाटगे, नेते भाजपा

तीव्र आंदोलन करणार

प्रत्येक वेळी अधिकारी उडवाउडवीचे उत्तर देत आहेत. बस अभावी मुलांची गैरसोय होत आहे. दोन दिवसात बस सुरु न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार आहोत.
-राधाकिसन आव्हाड, सरपंच

शहीद पत्रकार शोयब उल्लाखान यांच्या स्मृती प्रित्यर्थ ग्रीन आर्मी च्या वतीने वृक्षारोपण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

हैदराबाद मुक्ती संग्रामात अनेक योध्यांनी हुतात्मे पत्करले. व हैदराबाद मुक्त केला .त्यापैकी पत्रकार शोयब उल्ला खान यांच्या स्मृतिदिनी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने शहीद स्मृती स्तंभाजवळ वृक्षारोपण करून शहीद दिन साजरा करण्यात आला .यावेळी संस्थेचे मार्गदर्शक डॉ. सुरेश खुरसाळे, संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर सचिव कमलाकर चौसाळकर उपाध्यक्ष जी बी व्यास, सहसचिव प्राचार्य भीमाशंकर शेटे ,प्राचार्य रमण देशपांडे मेजर एस पी कुलकर्णी प्रा.रमेश सोनवलकर ,प्रा.शैलजा भरुरे, प्रा. संकेत तोरंबेकर आदी उपस्थित होते.

निजामाच्या अन्याय ,अत्याचार जुलूम यांच्या विरोधात आपल्या वर्तमानपत्रातून लेखणीच्या माध्यमातून लोक चळवळ उभी केली. व अन्यायाच्या विरुद्ध उठाव केला त्या आंदोलनात ▶▶ पान ३ वर...

उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांची जनसन्मान यात्रा बीड मतदारसंघात येणार

जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांची पत्रकार परिषदेत माहिती

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेला सर्व सामान्यांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. ही यात्रा बीड शहरात येत असून राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसन्मान यात्रेची सभा शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे गुरूवारी (दि.२९) होणार आहे, याची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी दिली.

बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात नियोजनाची सोमवारी बैठक पार पडली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ॲड.चव्हाण हे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बबनराव गवते, मोईन मास्टर, फारूक पटेल, डॉ.सारिका क्षीरसागर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड.प्रज्ञाताई खोसरे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, युवक तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, ॲड.राजेंद्र राऊत, नगरसेवक शुभम धूत, अल्पसंख्याक महिला आघाडी जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, विद्यार्थी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष इंजि.अजिंक्य आनेराव, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर आदींची उपस्थिती होती.पुढे बोलताना ॲड.राजेश्वर चव्हाण म्हणाले ▶▶ पान ३ वर...

खोलेश्वर महाविद्यालयाच्या वतीने कर्नल हेमंत जोशी यांचा सत्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभागाच्या वतीने व अंबाजोगाई सेक्टर च्या वतीने ५३ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल हेमंत जोशी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कर्नल हेमंत जोशी हे येथील योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी आलेले असताना अंबाजोगाई सेक्टर कमांडर ५१ महाराष्ट्र बटालियन चे अंबाजोगाई सेक्टर कमांडर तथा खोलेश्वर महाविद्यालयाच्या एन.सी.सी विभागाचे प्रमुख कॅप्टन सुंदर खडके यांनी व त्यांच्या कॅडेट्सनी सन्मानपूर्वक पायलटिंग करत कर्नल जोशी यांना मंदिरात आणले. ▶▶ पान ३ वर...

अंभोरा पोलिस स्टेशनच्या विद्यमाने सरस्वती विद्यालयात पोलिस काका व पो.दिदी उपक्रम संपन्न

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राज्यात व देशात सतत घडत असलेले बलात्कार लैंगिक अत्याचारांच्या घटनेला राज्य सरकारने गांभिर्याने घेऊन अशा घटनांना वेळीच आळा घालण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला आदेशित केले आहे.या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाण्या अंतर्गत दौलावडगाव ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती उच्च व माध्यमिक विद्यालयामध्ये आज मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांना अंभोरा पोलीस ठाण्यातील एपीआय श्री मंगेश साळवे साहेब यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो कायद्याचे सविस्तर माहिती दिली त्यामध्ये

बालविवाह, बाल गुन्हेगारी, लैंगिक अत्याचारावरील घटना यावर शिक्षेचे कडक प्रावधान अशा विविध विषयी सविस्तर मार्गदर्शन श्री साळवे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून माहिती दिली व अशा प्रकारच्या तक्रारी आमच्याकडे आल्या तर आम्ही दोषीवर कडक कार्यवाही करू असे आश्वासन दिले शाळा भरताना व सुट्टीच्या वेळी रस्त्या ने टुकार मुले मुलींची छेडछाड किंवा वाकड्या नजरेने पाहून त्रास देत असतील तर अशा मुलांचाही बंदोबस्त करू दौलावडगावचे ▶▶ पान ३ वर...

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या उमेदवारांची निवड ही गटशिक्षण कार्यालय स्तरावर व्हावी शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत निवडण्यात येणारे उमेदवार हे गट शिक्षण कार्यालय स्तरावर निवडण्यात यावेत अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाईच्या वतीने गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे एक निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रत्येक गावातील सुशिक्षीत उमेदवाराची निवड करण्याची जबाबदारी ही प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापक यांच्यावर दिल्यामुळे प्रत्येक गावातील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारे ताणतणाव व दडपण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे होणाऱ्या निवडी या निरपेक्ष अशा पद्धतीने होऊ शकणार नाहीत . यामध्ये शिक्षक व मुख्याध्यापक यांची मोठ्या प्रमाणावर अडचण निर्माण होऊन त्यांच्यावर मानसिक तथा शारीरिक ताण पडनार आहे. याचा परीणाम शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर होण्याची शक्यता आहे.याकरीता गटशिक्षणाधिकारी यांना या निवेदनाद्वारे विनंती करण्यात येते की सदरील योजनेतील पात्र उमेदवाराची निवड आपण आपल्या स्तरावर संपुर्ण माहीती संकलित करूनं करावी. जेणे करून ▶▶ पान ३ वर...

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातील त्या तरुणीची हत्या दोन दिवसांपूर्वी?

खराडी प्रकरणात नवा खुलासा समोर, पोलिसांकडून वेगाने तपास

पिंपरी । प्रतिनिधी

पुण्यातील खराडी येथे नदीपात्रात तरुणीचा हात-पाय-शीर कापलेल्या अवस्थेतील मृतदेहाबाबत महत्वाची माहिती समोर आली आहे. दोन- तीन दिवसांपूर्वी ही हत्या घडली असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. पुणे, पिंपरी- चिंचवडमध्ये गेल्या दोन दिवसांत दाखल झालेल्या मिसिंग केसचे रेकॉर्ड तपासले जात आहे. दुसरीकडे या प्रकरणाचा तपास चंदननगर पोलीस आणि पुणे पोलिसांची गुन्हे शाखा अशा दोन पथकांनी सुरू केला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, खराडी परिसरात एका इमारतीचे काम सुरू असून या साईटवरील बांधकाम मजुरांनी नदीपात्रात एका तरुणीचा मृतदेह वाहून आल्याचे सोमवारी (दि. २६) सकाळी अकराच्या सुमारास पाहिले. त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली.

तरुणीची ओळख पटू नये म्हणून शीर धडावेगळे करण्यात आले आहे. पोलिसांनी मृतदेह ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला. तरुणीचे वय अंदाजे १८ ते ३० वर्ष असल्याची माहिती चंदननगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांनी दिली. तरुणीची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. यासाठी बेपत्ता झालेल्या तरुणींचे रेकॉर्ड तपासले जात असून, याद्वारे आरोपीचा काही सुगावा लागतोय का? याचा देखील पोलीस तपास घेत आहेत. याप्रकरणी चंदननगर पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमका खून कुठे झाला?

पुण्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी मुठा नदीत सोडण्यात आले आहे. पुढे संगम पुलाजवळ मुळा आणि मुठा नदीचा संगम होऊन मुळा-मुठा नदी पुढे संगमवाडी, येरवडा आणि खराडी या दिशेने वाहत जाते. नदीच्या जोरदार प्रवाहासोबत हा मृतदेह पुणे शहर परिसरातून वाहत आलेला असू शकतो. त्यामुळे ही खुनाची घटना नेमकी कुठे घडली? मृत तरुणी नेमकी कोण आहे? खूनामागचे कारण? अन् आरोपी कोण? या प्रश्नांची उत्तरे शोधणे पोलिसांसमोर मोठे आव्हान असणार आहे.

हॉटेल मध्ये हुक्का पार्लर चालवल्या प्रकरणी पाच जणांवर गुन्हा



पुणे। प्रतिनिधी

हॉटेल मध्ये हुक्क्यासाठी वेगळा झोन तयार न करता गिऱ्हाईकांना जेवणास व हुक्का पिण्यास एकाच ठिकाणी बेकायदेशीरपणे जागा उपलब्ध करून दिली. याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई विनोदेवस्ती येथील द बी ५ रुफटॉप हॉटेल मध्ये करण्यात आली.

संजीत जोगेंद्र साहू (वय २१, रा. हिंजवडी. मूळ रा. ओडिशा), शिवू गिर बुढाथोकी (वय २०, रा. हिंजवडी. मूळ रा. नेपाळ), हॉटेल व्यवस्थापक शाहीद शेख, सुदर्शन, चालक मालक तुषार भूमकर अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार अमोल बुरटे यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी विनोदेवस्ती येथील द बी ५ रुफटॉप हॉटेल मध्ये आलेल्या ग्राहकांना जेवणास व हुक्का पिण्यास वेगवेगळा झोन तयार करून दिला नाही. जेवण आणि हुक्का पिण्यासाठी एकाच ठिकाणी बसवले. हॉटेल मध्ये बेकायदेशीरपणे हुक्का विक्री सुरु असल्याने हिंजवडी पोलिसांनी कारवाई करत दोन हजार ४५० रुपये किमतीचा हुक्का पॉट आणि हुक्का फ्लेवर जप्त केला आहे. हिंजवडी पोलीस तपास करीत आहेत.

थोडक्यात

बेपत्ता झालेल्या दहा वर्षांच्या मुलाचा अवघ्या काही तासांत शोध

पुणे । प्रतिनिधी

शाळा सुटल्यानंतर बेपत्ता झालेल्या दहा वर्षांच्या मुलाचा पोलिसांनी तत्परतेने शोध घेत त्याला पालकांच्या ताब्यात दिले. पालकांनी मुलगा हरविल्याची तक्रार दिल्यानंतर काही तासांत त्याचा शोध घेण्यात आला.

लोहगाव परिसरात राहणारा दहा वर्षांचा मुलगा सोमवारी (दि. २६) दुपारी शाळेतून घरी आला नाही. त्यामुळे घाबरलेल्या पालकांनी त्वरित लोहगाव पोलिस चौकीत तक्रार दिली. मुलगा बेपत्ता झाल्यानंतर लोहगाव पोलिस चौकीतील सहाय्यक पोलिस निरीक्षक शिंदे, धामणे, क्षीरसागर, धेंडे, शिरसाट, थोरात आणि लष्करे यांनी मुलाचा शोध घेण्यास सुरुवात केली. पोलिसांनी शाळेच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. नागरिकांना मुलाबाबतची माहिती दिली. मुलगा लोहगाव परिसरातील खंडोबाचा माळ परिसरात दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे धाव घेतली. मुलाला पालकांच्या ताब्यात देण्यात आले. मुलगा बेपत्ता झाल्यानंतर त्याचा त्वरित शोध घेतल्याने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तपास पथकाचे कौतुक केले.

गांजा विक्री प्रकरणी दोघांना अटक; नऊ किलो गांजा जप्त

आळंदी। प्रतिनिधी

गांजा विक्री प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथकाने दोघांना आळंदी मधून अटक केली. त्यांच्याकडून नऊ किलो ४७ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (दि.२५) सायंकाळी करण्यात आली.

देवेंद्र प्रमोद घाटोळे (वय २५, रा. आळंदी), प्रसन्न मधुकर मुंगसे (वय २४, रा. दिघी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्यासह विठ्ठल पवार (रा. देहूगाव) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार विजय दौंडकर यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी देवेंद्र आणि प्रसन्न यांनी विक्रीसाठी गांजा बाळगला. याबाबत माहिती मिळाल्यानंतर अमली पदार्थ विरोधी पथकाने आळंदी मध्ये सापळा लाऊन दोघांना ताब्यात घेतले. त्याच्याकडून नऊ किलो ४७ ग्रॅम गांजा, तीन मोबाईल फोन आणि एक दुचाकी असा एकूण पाच लाख ४७ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला. त्यांच्याकडे मिळालेला गांजा त्यांनी देहूगाव येथील विठ्ठल पवार याच्याकडून आणला असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. त्यामुळे विठ्ठल पवार याच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला. दिघी पोलीस तपास करीत आहेत.

ओव्हरटेक करताना वाहनाची दुचाकीला धडक; दुचाकीस्वाराचा मृत्यू

पुणे। प्रतिनिधी

दुचाकीला ओव्हरटेक करताना अज्ञात वाहनाचा धक्का दुचाकीला लागला. यामध्ये दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात पुणे-नाशिक महामार्गावर कुरुळी येथे घडला.

चंद्रकांत एकनाथ आवटे (वय ३१, रा. शेलगाव, ता. खेड) असे मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी निलेश कैलास आवटे (वय ३३, रा. शेलगाव) यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रकांत आवटे हे त्यांच्या दुचाकी (एमएच १४/एचबी ९०८८) वरून पुणे-नाशिक महामार्गावरून जात होते. कुरुळी गावातील बर्गे वस्ती येथे अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या वाहनाचा धक्का चंद्रकांत आवटे यांच्या दुचाकीला बसला. त्यामध्ये चंद्रकांत आवटे हे रस्त्यावर पडले. त्यात त्यांच्या डोक्याला, हाताला, पायाला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अज्ञात वाहन चालक अपघात झाल्यानंतर पळून गेला. महाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

रेनकोटवरून बीडच्या तरुणाचा खून

पुणे। प्रतिनिधी

रेनकोटवरून झालेल्या वादातून एका तरुणाचा भर रस्त्यात चाकूने भोसकून खून करण्यात आला. ही घटना नर्हेतील झिल कॉलेज चौकात रविवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास घडली. याप्रकरणी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आदित्य श्रीकृष्ण वाघमारे (वय २३, रा. धारूर, बीड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सुरेश भिलारे नावाच्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे.

दोघेही एका कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होते. याबाबत सिद्धेश्वर ऊर्फ प्रवीण भारत मोरे (वय २४, रा. वाल्हेकर चौक) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ओला कारचालक आहेत. तर मयत आदित्य हा त्यांच्यासोबत रूमवर राहात होता. तो दिवसा डॉमिनोजमध्ये तर रात्री ॲमेझॉनमध्ये डिलिव्हरी बॉय म्हणून काम करायचा. त्याची आणि आरोपीचे दुपारी भांडणे झाले होते. आदित्य याने दुपारी घरी येऊन फिर्यादीला सांगितले की, मला डॉमिनोजमधील मॅडमने रेनकोट

दिला होता. तो सुरेशने मला काढायला भाग पाडले. यानंतर आमच्यात वाद झाला तेव्हा तो माझ्या बोटाला चावला. आपण त्याला भेटून वाद मिटवू असे सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादीने सुरेशला रात्री फोन केला. मात्र सुरेशने फोनवर बोलण्यास नकार देत नर्हे येथील हॉटेल मराठा येथे भेटायला बोलावले. यामुळे फिर्याद प्रवीण मोरे, आदित्य, रतन शिंगाडे, सचिन तांगडे असे सर्व रूममेट त्यांच्या कारमधून सुरेशला भेटायला गेले. तेथे सुरेशने आदित्यला उद्देशून शिवी दिल्याने आदित्यने सुरेशच्या कानाखाली मारली. यामुळे सुरेशने त्याच्या पँटच्या खिशातील लपवलेला चाकू काढून आदित्यच्या डाव्या काखेजवळ मारला. यामुळे आदित्य घाबरून झिल कॉलेजच्या दिशेने पळू लागला. त्याच्या मागे सुरेशही पळत गेला. थोड्याच अंतरावर आदित्यला पकडून छातीत चाकू मारला. यामुळे आदित्य रस्त्यावर कोसळला. कारमधून फिर्यादीसह तिघे तेथे पोहचले. तेव्हा आरोपीने चाकू दाखवत त्यांना रोखले. रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्यांनाही त्याने चाकू दाखवत धमकावले. यानंतर सुरेश तेथून पळून गेला. आदित्यला रुग्णालयात मृत घोषित करण्यात आले.

चार दिवसांत दुसरा खून

सिंहगड रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन दिवसांपूर्वीच एका तडीपार सराईत गुन्हेगाराचा हातोड्याने वार करत खून करण्यात आला होता. यानंतर लगेचच ही दुसरी खुनाची घटना घडली आहे. त्यामुळे सिंहगड रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत चाललेय काय? असा सवाल उपस्थित झाला आहे.

महिला अत्याचाराच्या घटनांबाबत सरकारला लाज वाटायला हवी - सुप्रिया सुळे

बारामती । प्रतिनिधी

या राज्यात महिलांवर होणारे अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढले आहे, महिला अत्याचाराबाबत सरकार असंवेदनशील आहे, दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासंदर्भात घडलेली घटना वेदनादायी आहे, या प्रकाराची संपूर्ण चौकशी व्हायला हवी, या प्रकाराबद्दल राजकारण केले जाते असे भाजपच्या नेत्यांनी बोलणे या बद्दल या सरकारला लाज वाटायला पाहिजे, या प्रकाराचा आणि सरकारचाही आम्ही जाहीर निषेध करतो अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

बारामतीतील पक्ष कार्यालयात माध्यमांशी त्या बोलत होत्या. या सर्व प्रकाराच्या निषेधार्थ बारामतीत आम्ही बुधवारी जोरदार आंदोलन करणार आहोत, इतका भ्रष्टाचार, महागाई व बेरोजगारी या अगोदर या राज्यात कधीच नव्हती, असे त्या म्हणाल्या. महिलांवरील अत्याचाराबाबत विचारता त्या म्हणाल्या उध्दव ठाकरे यांच्या काळात शक्ती कायदा आणला होता, तो दिल्लीला पाठविला गेला, त्याचे पुढे काहीच झाले नाही, महाराष्ट्राचे गृहमंत्री आहेत कुठे, अर्धा वेळ ते दिल्लीतच असतात, राज्यमंत्री उपलब्धच नाहीत अशी टीका त्यांनी केली. हर्षवर्धन पाटील यांची ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर सहकारी साखर कारखानदारीसंदर्भात त्यांची चर्चा झाली असावी, माझे व हर्षवर्धन पाटील यांचे बोलणे झालेले नाही, त्या मुळे मला या बाबत माहिती नसल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या.जितेंद्र आव्हाड यांनी एका मुली संदर्भात केलेल्या वक्तव्याची क्लिप व्हायरल झाल्याबाबत विचारले असता या क्लिपची संपूर्ण तपासणी करावी लागेल, जर चुकीचे विधान केले असेल मग ते कुणीही असो ते योग्य नाही पण ही क्लिप संपादीत केलेली आहे किंवा कसे याची शहानिशा होणे गरजेचे आहे. माझा विश्वास आहे की जितेंद्र आव्हाड अस बोलणार नाहीत. युगेंद्र पवारांच्या उमेदवारीबाबत विचारले असता सीट फायनल झालेल्या नाहीत या बाबत लोकांच्या भावना विचारात घेत निर्णय घेतला जाईल, असे त्या म्हणाल्या.

अण्णाभाऊ यांनी लोकशाहीच्या छाताडावर उभे राहून क्रांती घडवली - यशवंत गोसावी

दौंड। प्रतिनिधी

अण्णा भाऊ साठे हे व्यक्तिमत्त्व फक्त मातंग समाजाचे नसून बहुजनांचा श्वास आहे. दीड दिवस शाळेत जाणारे अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीच्या छाताडावर उभे राहून क्रांती घडवली. त्यांनी त्या काळी दिलेले विचार, संस्कार आजही प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन व्याख्याते यशवंत गोसावी यांनी केले. देलवडी (ता.दौंड) येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित 'अण्णा भाऊ साठे एक दीपस्तंभ' या विषयावर व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी गोसावी म्हणाले की, अण्णा भाऊ साठे यांनी ३२ भाषांमध्ये लेखन केले. त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे. अद्याप त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कारही मिळाला नाही ही आपली शोकांतिका आहे. ते क्रांती घडवण्यासाठी रशियाकडे रवाना झाले. अण्णाभाऊंचा विचार गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनातून सांगितला. थोर पुरुषांचे विचार हे अनुकरणीय असतात. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक रमेश थोरात, भाजप राज्य महिला उपाध्यक्ष कांचन कुल, राष्ट्रवादी शरद पवार गट राज्य सरचिटणीस नामदेव ताकवणे, भीमा पाटसचे संचालक विकास शेलार, शिवाजी वाघोले, सोमनाथ शेलार, काशिनाथ शेलार, बंडू शेलार, दत्तात्रेय शेलार, चांगदेव अडागळे, तात्या काळे आदी मान्यवर उपस्थित होते. संयोजन अण्णा भाऊ साठे मित्र मंडळाचे राजेंद्र अडागळे, विष्णू अडागळे, सुरेश अडागळे, विशाल अडागळे, रमेश अडागळे, समीर अडागळे, शुभम अडागळे, शंकर भिसे, सागर साळवे, गणेश धायगुडे, राजू अडागळे, संजय अडागळे यांनी केले.

व्यसनाधीनतेमुळे आयुष्य दिशाहीन होते - डॉ.दुधगावकर

पुणे। प्रतिनिधी

व्यसनाधीनतेमुळे आयुष्यात कशाचाच ताळमेळ लागत नाही. अंमली पदार्थ मेंदूवर सर्वात जास्त परिणाम करतात. यामुळे मेंदूची काम करण्याची पद्धत प्रभावी होत असून याचा परिणाम तुमच्या वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक आयुष्यावर मोठ्या प्रमाणात होते. आयुष्य दिशाहीन होते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत दुधगावकर यांनी केले.

विद्यापीठात व्यसनमुक्तीवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांच्या व्यसनाबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे देशातील सर्व शैक्षणिक संस्थांना 'नशा मुक्त भारत अभियान' राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यांतर्गत विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राद्वारे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कौशल्य विकास केंद्राचे अतिरिक्त संचालक डॉ. आर. एस. पंडित, डॉ. अंजली जगताप, डॉ. रवी आहूजा. डॉ. पुजा मोरे उपस्थित होत्या. व्यसनाधीनता हा मेंदूचा आजार आहे. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे व्यक्ती स्वतःवरील नियंत्रण हरवून बसतो. आधी कूल आणि कॉन्फिडंट वाटण्यासाठी सुरू केलेले सेवन नंतर नाईलाज म्हणून करावे लागते. यामुळे आपल्याला दैनदिन जीवनात आनंद देणाऱ्या गोष्टींचा आनंद वाटत नाही. बधिरता येते आणि याचा परिणाम अप्रत्यक्षपणे कुटुंबावर, मित्र परिवारावरही होत असल्याचे डॉ. दुधगावकर यावेळी म्हणाले. व्यसनाधीनता म्हणजे काय?, यामागची कारणे, यामुळे शरिरावर-मेंदूवर होणारे परिणाम, प्रतिबंध करण्यासाठीचे उपाय यांसारख्या विविध पैलूंवर डॉ. दुधगावकर यांनी चर्चा केली. यावेळी बी.वोक प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभही पार पडला. याप्रसंगी डॉ. आर.एस. पंडित यांनी या विद्यार्थ्यांना संबोधित केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती राऊत, शुभम बल्लाळ, चिराग भोसले आणि तन्मय गाडे यांनी परिश्रम घेतले.

पुण्यातील ८० बालकलाकारांनी अयोध्येत सादर केले गीतरामायण

पुणे। प्रतिनिधी

पुण्यातील ८० बाल कलाकारांनी रविवारी (दि. २५) अयोध्या स्थित प्रभु श्रीराम मंदिराच्या प्रांगणात ग दि माडगूळकर व सुधीर फडके रचित गीतरामायण सादर केले. पुणे येथील प्राजक्ता जहागीरदार यांच्या स्वरतरंग संगीत अकादमीतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. पुण्यातील स्वरतरंग संगीत अकादमी तर्फे बाल कलाकारांच्या गटासह होणारा व अयोध्या स्थित श्रीराम मंदिरात होणारा हा गीत रामायणाचा पहिला कार्यक्रम सादर करण्याचा मान पुण्यातील बाल कलाकारांना लाभला.

दोन तासाहून अधिक काळ चाललेल्या या गायन कार्यक्रमात बाल कलाकारांनी गीतरामायणातील निवडक

१६ सुमधुर गाणी सादर केली. त्यास उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला. साथसंगत व्हायोलिनवर रमाकांत परांजपे, ईरा परांजपे, हार्मोनियमवर जयंत साने व मालती बेहेरे, तबल्यावर अभिजित जायदे, संतोष वैद्य तर तालवाद्यावर प्रसाद भावे यांनी संगत केली. कार्यक्रमास राममंदिर ट्रस्टचे प्रकल्प व्यवस्थापक जगदीश आफळे, माधुरी आफळे, एल एँड टी मंदिर बांधकाम कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक सतीश चव्हाण, या श्रीराम मंदिर प्रकल्पाचे व्यवस्थाप्रमुख फुलचंद मिश्रा आदी मान्यवरांनी उपस्थित राहून मुलांचे कौतुक केले. यावेळी बाल कलाकारांचे पालक, महाराष्ट्रातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी प्रकल्प व्यवस्थापक जगदीश आफळे यांनी श्रीराममंदिराचा पूर्व इतिहास व उभारणीसंबंधीचे सादरीकरण करून या प्रकल्पाविषयी सर्व माहिती पालक व भाविकांसमोर सविस्तर मांडली. याआधी पुण्यात स्वरतरंग संगीत अकादमी तर्फे गीत रामायण, बालमुखातून स्वातंत्र्यवीर सावरकर अशा विविध विषयावरील सामुहिक सादरीकरणाचे यशस्वी आयोजन केले आहे.

हर्षवर्धन पाटील आणि शरद पवारांच्यात बैठक

पुणे। प्रतिनिधी

आगामी विधानसभेच्या अनुषंगाने नेत्यांच्या पक्षबदल आणि भेटीगाठी या घडामोडी राज्याच्या राजकारणात वाढल्या आहेत. अशातच मंगळवारी राज्याचे माजी मंत्री आणि भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील हे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू असतानाच त्यांनी शरद पवारांची भेट घेतली. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि माजी मंत्री आणि भाजपचे नेते हर्षवर्धन पाटलांमध्ये बैठकही पार पडली. शरद पवार यांची वसंत दादा शुगर इन्स्टिट्युटमधली बैठक संपल्यानंतर पुन्हा शरद पवार आणि हर्षवर्धन पाटलांमध्ये बैठक झाली. या बैठकीनंतर ते शरद पवारांसोबत जाण्याच्या चर्चेला उधाण आले आहे, या बैठकीत नेमके काय घडले याबाबतची उत्सुकता नेत्यांना लागली आहे.

या बैठकीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना हर्षवर्धन पाटील म्हणाले, बैठकीमध्ये संस्थेच्या संदर्भात चर्चा झाली. राज्यात अनेक ठिकाणी साखर कारखारण्यासंदर्भात जागेसंदर्भात चर्चा झाली. शरद पवार गटात प्रवेश करण्यासंदर्भात कोणती चर्चा झाली नाही असे हर्षवर्धन पाटलांनी म्हटले आहे. तीन आठवड्यांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली होती. ते निर्णय घेतील ते पाहावे लागेल. आम्ही लोकांच्यात असतो. कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

काय झाली चर्चा याबाबत चर्चेला उधाण

महायुतीच्या जागावाटपात अंतिम निर्णय झाला नाही. त्या कमिटीत मी नाही, मी कोअर कमिटीत आहे. त्यात तरी जागावाटपाबाबत चर्चा झाली नाही.

महायुतीच्या संदर्भातील निर्णय फक्त भाजप घेणार नाही. राहिला प्रश्न इंदापूरचा तर कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. हे पाहून वरिष्ठ निर्णय घेतील. महायुतीत जागावाटपाचा निर्णय झालेला नाही. कार्यकर्ते म्हणत आहेत की आपल्याला महायुतीच तिकीटच मिळाले पाहिजे. काही म्हणतात अपक्ष उभे राहा मात्र ही कार्यकर्त्यांची चर्चा आहे याबाबत कोणीही माझ्याशी संपर्क साधलेला नाही, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.